भाग : २



साधनपदावली

संकलन, संपादन, पदभूमिका

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

साधनपदावली

भाग : २

(पदभूमिकांसह)

(भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग व पदे)

❐

संकलन, संपादन, गायन

डॉ. सुहास पेठे

एम्.ए., पीएच्.डी.

* साधनपदावली : भाग २

पुस्तकरूपाने प्रकाशित पहिली आवृत्ती : ऑक्टोबर २०१२
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

सकल संतचरणी कृतज्ञतापूर्वक समर्पण

- सुहास पेठे

पार्श्वभूमी

श्रींच्या कृपेने साकारलेल्या 'पदावली' ची ही स्वतंत्र आवृत्ती साधकांच्या सेवेत सादर करताना आनंद होतो. 'साधनपदावली'च्या सातव्या आवृत्तीनंतर मध्यंतरी 'साधनसांगाती' या नावाने संतछायेतील समग्र उपासना विस्तृत स्वरूपात उपलब्ध झाली होती. ती आता येथील नित्योपासनेपुरती राहणार असल्याने व त्याची सुधारित आवृत्ती, त्यात सातत्याने पडत असलेली भर लक्षात घेता, सतत प्रसिद्ध करणे अवघड आहे. त्यामुळे ती भर शक्यतो येथील आवृत्तीत हाती घालण्यात येत आहे. मात्र परगावच्या तसेच येथीलही साधकांच्या घरच्या उपासनेसाठी 'साधनपदावली' व 'कृपापदावली' यांची वाढती गरज लक्षात घेऊन आता 'साधनपदावली'ची आठवी आवृत्ती पहिला भाग म्हणून प्रसिद्ध होत आहे. तसेच 'कृपापदावली'चाही आता खूप विस्तार झाल्यामुळे 'कृपापदावली'चा पहिला भाग प्रसिद्ध होत आहे. या दोनही पदावलींचे पुढील भाग अनुकूलतेनुसार प्रसिद्ध होत आहेत.

पदांच्या निवडीमागील विचार पूर्वीप्रमाणेच ठेवण्यात आला असून कोणता विशिष्ट संप्रदाय, कर्ता, मत अशा गोष्टींना प्राधान्य दिले जात नसून भाव, भक्ती, विचार, करुणा, तळमळ, मार्ग, सावधानता इत्यादी गोष्टी प्रधान धरल्या आहेत. त्यामुळे सर्व पंथांतील किंवा वेळी कुठल्या पंथाशी बांधील नसलेल्या पण जिज्ञासू व्यक्तींनाही या दोन्ही पदावलींचा व त्यांतील प्रार्थना, अभंग, पदे, आरत्या, श्लोक,

नवनव्या उपासनामाला, नवे नित्यपाठ – यांचा यापुढेही पूर्वीप्रमाणेच उपयोग होईल, अशी आशा आहे.

त्यामुळे साधनेचा मार्ग, विचार स्पष्ट होईल, प्रपंचात व परमार्थातही अत्यंत गरजेची असलेली सावधानता बाळगता येईल, खाचखळगे कळून येतील, टाळता येतील, दिशाभूल वाचेल, अवडंबर –कर्मठपणा कमी होईल, आपापला पंथ– साधन– गुरू–नाम यांच्याविषयी भाव वाढेल पण त्यांतली आग्रही भूमिका कमी होईल, इतर साधने – संप्रदाय यांविषयी आदरभाव निर्माण होईल, तसेच स्वतःच्या गुरूंविषयी, उपास्याविषयी भाव स्वच्छ, निश्चित व शुद्ध होईल, अशी पदे घेण्याचा प्रयत्न केला आहे. तो साधकांना उपयोगी ठरावा, ही इच्छा.

यापूर्वीच्या आवृत्त्यांमध्ये तसेच साधनसांगातीमध्येही फक्त मूळ पदे, पदकर्ते व अनुक्रमणिका एवढ्याचाच समावेश केला होता.परंतु त्यानंतर त्या पदांच्या येथे म्हणण्यात असलेल्या चाली जिज्ञासूंपर्यंत पोचाव्या यासाठी, २००२ मध्ये प्रथम साधनपदावलीच्या अकरा कॅसेट्स् व कृपापदावलीच्या पाच कॅसेट्स् आणि नंतर सीडीज्, पुढे डीव्हीडीज् काळानुसार प्रसिद्ध करण्यात आल्या. त्यावेळी या पदांना पदभूमिकाही देण्यात आल्या होत्या. त्या भूमिका संक्षिप्त असल्या तरी, पदांचा अभ्यास करण्यासाठी त्यांचा साधकांना अतिशय उपयोग होत असतो, म्हणून पदावलीची पुढील आवृत्ती प्रसिद्ध करताना या भूमिकांचा समावेश या पदांबरोबर

करण्यात यावा अशी अनेकांची सूचना होती. ते या आवृत्तीपासून शक्य होत आहे, याचाही आनंद होतो. त्याचबरोबर आवश्यकतेनुसार कठीण शब्दांचा अर्थही त्या त्या ठिकाणी देण्याचा प्रयत्न केला आहे .

पदावलीच्या या निरंतर प्रकल्पाला अनेकांचा हातभार लागत आला आहे. मूळ सोळा कॅसेट्सचे रेकॉर्डिंग अत्यंत आपुलकीने व सेवाभावाने करणाऱ्या सौ. राधिका हंगेकर, श्री. हंगेकरसाहेब व त्यांचे चिरंजीव यांना तसेच, घरी पुढील रेकॉर्डिंग, एडिटिंग तसेच या भागांचे प्रकाशन, वितरण यांना हातभार लावणाऱ्या सर्व लहानथोर साधकमंडळींना धन्यवाद द्यावे, तेवढे थोडेच आहेत.

साधनपदावलीतील पदांचे कर्ते – संतमंडळी, त्या पदांचे प्रकाशक व तीन कन्नड अभंगांचा अर्थ ज्या संकलनातून उद्धृत केला आहे, त्या श्री चैतन्यगाथेचे प्रकाशक आदी सर्वांचे ऋण न फिटणारे आहे. सर्व साधकांच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक आभार.

या दोन्ही पदावलींतील पदांना अनुकूल अशा चाली सुचणे ही केवळ संतकृपाच होय. त्यांचे गायन, हार्मोनियम साथ करण्यासाठी प्रतिकूल शारीरिक अवस्थेत इतकी वर्षे मला मिळालेली प्रकृतीची अनुकूलता तसेच पत्नी सौ. सुखदा हिचे प्रोत्साहन व सहकार्य हाही याच कृपेचा भाग होय. तसेच इतकी वर्षे जवळपास अडीचशे पदांना तबल्याची समजूतदार साथ रा.रा. नंदन तर, झांजेची साथ

श्री. मंगेश मंत्री करीत आले आहेत. हा ईश्वरी प्रसाद प्रेमळ साधकांपर्यंत पोचवण्यात त्यांचा असलेला सहभाग व सेवाभाव यांची मी ऋणज्ञतेने नोंद घेतो.

ही आवृत्ती प्रसिद्ध करण्यापूर्वी नुकतीच २१२ ट्रॅक्सची ऑडिओ डीव्हीडी क्र.७ प्रकाशित झाली आहे. ती ती पदे त्यातून ऐकण्यास सुलभ जावी म्हणून, पदाच्या शेवटी त्या त्या पदाचा ट्रॅक नंबर दिला आहे. अधिक सोयीसाठी श्रींच्या कृपेने साधनपदावलीची व कृपापदावलीची ऑडिओ सीडी पदावलीच्या भागानुसार लवकरच उपलब्ध करण्याचा विचार आहे. येथील पदांची मांडणी डीव्हीडी क्र.७ मधील क्रमाने केली असून विशिष्ट पद चटकन मिळावे म्हणून अनुक्रमणिका मात्र अकारविल्हे देण्यात आली आहे.

या दोन्ही पदावलींतील पदांच्या निरंतर अभ्यासाने, अर्थाच्या मनन चिंतनाने, ती पदे अर्थ लक्षात घेऊन मनापासून म्हणण्याने – आपले अंतरंग शांत होवो, उजळून निघो, ते परमार्थाला उत्तरोत्तर अधिक अनुकूल होवो – अशी श्री गोंदवलेकर महाराजांना व सर्व संतसत्पुरुषांना प्रार्थना करून, या पदावलींची सेवा त्यांच्या चरणी अर्पण करीत आहे.

संतछाया,
सातारा. **- सुहास पेठे**

साधनपदावली भाग : १

वर्णानुक्रमणिका

अनुक्रमांक	पदाची सुरुवात	पृष्ठ क्रमांक
१.	अगर है ज्ञान को पाना	..३१..
२.	अवघे निरंतर करा हा विचार	..३५..
३.	असाल तेथे नामाचे चिंतन	..३३..
४.	असो आता ऐसा धंदा	..५३..
५.	आजवरी तुम्हा सांगितली मात	..७५..
६.	उपासना प्रकट झाली	..५१..
७.	कळो आली शांती	..९७..
८.	काय होऊ उतराई	..८९..
९.	कूताग रामा निंताग रामा	..१५..
१०.	कैसी लागे मज या नामाची गोडी	..६१..
११.	गुरुकृपा भागीरथी भेटो आली तुज प्रती	..७९..
१२.	गुरुपायी सर्व तीर्थ । नाम मुखात समर्थ	..३९..
१३.	गुरुवीण दुजा सापडेना देव	..४१..
१४.	जाणावे ते काय नेणावे ते काय	..४५..
१५.	जेणे अंतरती हरी	..९९..
१६.	ज्याचे मन शुद्ध झाले	..१०३..
१७.	तुमचा परोचा दिला तुम्हापाशी	..७३..
१८.	तुमचे नामसंकीर्तन । हेचि माझे संध्यास्नान	..२७..
१९.	देवा तुझे द्वारी वसो ऐसे करी	..५७..
२०.	देहालागी कष्ट केले	..३७..

अनुक्रमांक	पदाची सुरुवात	पृष्ठ क्रमांक
२१.	नाम हरीचे गोड । सखया	..८३..
२२.	नेणो भक्ती नेणो भाव	..९१..
२३.	पोटापुरते काम	..१०७..
२४.	पृथ्वी ध्यासी तरी पृथ्वीची होसी	..२१..
२५.	प्रभुविण कोण कुणाचा वाली	..६५..
२६.	बंध विमोचन राम	..१०१..
२७.	भजनाचा शेवट आला	..५५..
२८.	भजो रे भैया	..९५
२९.	भवव्यथेसी औषध । रामनाम हे प्रसिद्ध	..७७..
३०.	भवसागर उतरेना	..८७..
३१.	मज नाही ताल गळा	..१७..
३२.	मारुती माझा मायबाप	..१९..
३३.	मुसाफिर जागते रहना	..६३..
३४.	राम माझी माय, कई भेटईल	..४७..
३५.	राम होउनि राम गा रे	..२३..
३६.	रामनाम वदो वाणी	..८५..
३७.	विवेक विल्हद जन्मउ व्यर्थ	..२९..
३८.	शरणागत असता	..९३..
३९.	संत समागम जोड । मनुजा	..४९..
४०.	सकळ साधनांचे फळ	..२५..
४१.	सांडियेली लाज जाति अभिमान	..६७..
४२.	साधकाने नित्य	..१०९..
४३.	सुखसागर आपण व्हावे	..१०५..

अनुक्रमांक	पदाची सुरुवात	पृष्ठ क्रमांक
४४.	सोडू नये तुझे स्मरण	..६९..
४५.	स्वामी देई हेचि दान	..७१..
४६.	हरि आला रे हरि आला रे	..५९..
४७.	हरिची भक्ती बरी, भक्ती बरी	..४३..
४८.	हरिचे गुण गाई मनुजा	..८१..
४९.	हरि भजन करे तो	..१३..

*

भूमिका

भगवंताशी संवाद साधायला जी अनेक साधनं आहेत, त्यांत भजन हे अत्यंत पुरातन, सुगम, प्रभावी आणि अनुभवसिद्ध साधन आहे. अभंगाला किंवा पदाला जुजबी तालासुराची जोड दिली तर, त्यातल्या भावाचा परिपोष होतो आणि स्वतःचा विसर पडून भगवंताचं अनुसंधान वाढायला मदत होते. पण यासाठी भजनाकडं भगवंतप्राप्तीचं साधन म्हणून पाहण्याची गरज आहे. साधन म्हणून त्यात तालासुरापेक्षा त्यातल्या शब्दांना, अर्थाला, भावाला आणि त्याहीपेक्षा त्यात व्यक्त झालेल्या पदकर्त्याच्या हृदयाला जास्त महत्त्व आहे. या अर्थानं भजन घडायचं तर, त्यासाठी पदं निवडताना ती साधकवृत्तीची असावीत. करुणापर, श्रद्धापर, तळमळीची अशी असावीत. त्यांची चाल, ठेका हीसुद्धा साधी राखावी. सर्वांना म्हणता येतील अशी ठेवावी. अशा काही खुणा श्री गोंदवलेकर महाराज आणि पू. बाबा बेलसरे यांनी सांगितलेल्या आहेत. या दृष्टीनं भजन लिहिताना जसं कविता नव्हे, तसं म्हणतानाही ते गाणं नव्हे अशा साऱ्या भूमिकेला धरून गेली अनेक वर्षं अनेक टप्प्यांमध्ये आणि भागांमध्ये या पदावलीची रचना करण्याचा प्रयत्न झाला आहे. त्यातली पदं म्हणताना त्यातल्या भावाशी तादात्म्य व्हावं आणि आपल्या साधनेला ती उपयुक्त ठरावी अशा दृष्टीनं ती ऐकावी, म्हणावी अशी कळकळीची विनंती आहे.

प्रत्येक माणूस आयुष्यभर सुखाचा पाठलाग करतो आहे. कधीकधी ते त्याला मिळाल्यासारखं वाटतंही पण, लगेचच त्याच्या लक्षात येतं की, ते वरवरचं आहे, नश्वर आहे, तो आभास आहे. म्हणून त्याचा हा पाठलाग अखेर विफल ठरतो. हे मायाजाल मोठं विचित्र आहे, हे सांगून या पदात श्री ब्रह्मानंद हे राजस्थानातील सत्पुरुष म्हणतात, खरं सुख हे अंतर्यामी असलेल्या भगवंताशी भेट होण्यात आहे. हे घडायला भगवंताच्या नामासारखं सोपं साधन नाही. त्यातही या साधनाला आपण भगवंताच्या भजनाची, भजन म्हणजे भक्तीचीही जोड दिली तर, माणसाला हे शाश्वत सुख खचितच मिळेल.

..१..

हरि भजन करे तो सुख पायगा रे।
नहि तो जनम जनम भटकायगा रे ।।धृ।।
भवसागर में नीर अपारा ।
हरि का नाम जहाज सुखारा ।
जपे जो निश्चय धार पार लगायगा रे ।।१।।
मायाजाल बडा है भारी ।
निकलन की नहिं दूजी बारी ।
मानुषतन जब छूटे फिर पछतायगा रे ।।२।।
चार दिवस का जग में डेरा ।
क्या करता है मेरा मेरा ।
खाली आया था फिर खाली जायगा रे ।।३।।
सकल जगत का कर्ता स्वामी ।
घट घट का प्रभु अंतर्यामी ।
'ब्रह्मानंद' सुमर नरदुख मिटायगा रे ।।४।।

– श्री ब्रह्मानंद, पुष्कर

सुमर – स्मरण कर

(ट्रॅक नं. ०५९)

भगवंताचं अखंड अनुसंधान हा भक्तीचा प्राण आहे. पूजाअर्चा करताना भगवंताचं स्मरण ठेवणं, हे चांगलंच आहे पण, आपल्या सगळ्या क्रियांत भगवंताचा संबंध, संदर्भ आणि आठवण ठेवणं हे खरं गरजेचं आणि आदर्श आहे.

कर्नाटकातले थोर सत्पुरुष श्री ब्रह्मानंद यांची अवस्था जळीस्थळीकाष्ठीपाषाणी रामच राम, अशी झाली होती. त्यामुळं कूताग राम, निंताग राम म्हणजेच बसताना राम, उभं राहताना राम असं त्यांना वाटे. या पदात पुढं ते म्हणतात जाताना, येताना, जेवताना, लिहिताना, वाचताना, ढळताना, कांडताना सर्वत्र रामच राम मला दिसतो. त्यांचं असं राममय होणं, साधक म्हणून फार आदर्श आणि शिकण्याजोगं आहे, असं वाटतं.

..२..

कूताग रामा निंताग रामा ।
मलगिकोंडाग रामने राम ।।१।।

होगुवाग रामा बरुवाग रामा ।
होगुबरूवाग रामने राम ।।२।।

उंबुवाग राम तिंबुवाग राम ।
उंबुतिंबुवाग रामने राम ।।३।।

ओदुवाग राम बरियुवाग राम ।
ओदुबरियुवाग रामने राम ।।४।।

कुट्टुवाग राम बीसुवाग राम ।
अडिगिमाडुवाग रामने राम ।।५।।

अणुरेणुतृणकाष्ठदल्लि राम ।
यल्लिनोडिदल्लि रामने राम ।।६।।

ब्रह्मानंदहृदयकमलदल्लि राम ।
ब्रह्मानंदरनुडियु रामने राम ।।७।।

– श्री ब्रह्मानंद

मराठी गद्य भावार्थ

बसताना राम व उभे राहताना राम व झोपले असताना रामच राम.१.
जाताना राम , येताना राम , जातायेताना रामच राम. २.
जेवताना राम , खाताना राम ,जेवताखाताना रामच राम . ३.
वाचताना राम , लिहिताना राम ,वाचतालिहिताना रामच राम. ४.
कुटताना राम , दळताना राम व जेवण करताना रामच राम . ५.
अणु,रेणु,गवत किंवा काष्ठ यांमध्ये राम,जेथे पाहावे तेथे रामही राम.६.
ब्रह्मानंदाच्या हृदयकमलात राम आहे व ब्रह्मानंदाच्या बोलण्यात रामच राम आहे.७.

(ट्रॅक नं. ०६०)

श्री गोंदवलेकर महाराजांनी भजन कसं असावं, हे काही ठिकाणी सांगून ठेवलंच आहे. पण इथं घेतलेला अभंग हा त्यांची भजनाची भूमिका सांगणाराच अभंग आहे. त्यामध्ये भजनाबद्दल भगवंताला प्रार्थनाही आहे आणि भक्तांना सल्लाही आहे. भजन म्हटलं की, आपल्याला सुरेल कमावलेला आवाज, रागदारीचा – संगीताचा सखोल अभ्यास, तालावर हुकुमत अशा अनेक गोष्टी दिसायला लागतात. गाणं म्हणून भजन म्हणणाऱ्यांच्या दृष्टीनं त्या ठी कही असतील, पण या साऱ्या गोष्टी समोर दिसायला लागल्या की, यातलं काहीच आपल्याजवळ नसल्यानं आपला धीर सुटायला लागतो. वास्तविक, जर असं असेल तर, भजन फक्त मोठमोठ्या गवयांनाच साधेल. पण ते तर भगवंताच्या प्राप्तीचं साधन आहे आणि भगवंत तर सर्वांना साध्य होणारा आहे. मग भजन सर्वांना शक्य असलं पाहिजे. भगवंताकडं जायचं आणि स्वत:ला विसरायचं साधन म्हणून भजन करू जाणाऱ्याला, या तालासुराची गरज नसते, असं सांगून श्री महाराज म्हणत भजनाला प्रेमळपणा लागतो. खऱ्या भजनाला ताल – सूर लागत नाहीत. तसं असतं तर, श्री तुकोबा आधी गाणं शिकले असते. या अभंगात श्री महाराज म्हणतात, भगवंत किती तन्मयतेनं तुम्ही त्याचं नाम घेता आहात, स्मरण करता आहात ते पहातो. तो तुमचा ताल – सूर पहात नाही. श्रींचं म्हणणं, भजन म्हणू इच्छिणाऱ्या साधकांना, दिलासा देणारं आहे.

..३..

मज नाही ताल गळा ।
नका करू हो कंटाळा ।।१।।

करा नामाचा गजर ।
भवसिंधु उतरा पार ।।२।।

नाम घ्यावे सर्व काळ ।
पुन्हा नाही ऐशी वेळ ।।३।।

काय आहे गळ्यापाशी ।
नाम घोका अहर्निशी ।।४।।

नका पाहू ताल गळा ।
वाचे राम राम बोला ।।५।।

दीनदासाचे हे बोल ।
तुम्ही मानू नका फोल ।।६।।

– श्री गोंदवलेकर महाराज

(ट्रॅक नं. ०६१)

श्री मारुतिराय हे त्यांच्या उपासकांना पूज्य आहेतच. पण भगवंताच्या दास्यभक्तीचं प्रतीक म्हणून इतर सर्व पंथांच्या उपासकांनाही ते पूज्यच वाटतात. आपली सारी शक्ती,बुद्धी आपल्या उपास्य देवतेच्या किंवा गुरूच्या कारणी कशी लावावी आणि त्याचबरोबर ती सारी भगवद्भक्तांच्या सेवेतही कशी वापरावी, याचा श्री मारुतिराय म्हणजे एक परम आदर्शच होत. त्या साऱ्या अर्थानं या पदामध्ये श्री गोंदवलेकर महाराज म्हणतात त्याप्रमाणं, श्री मारुतिराय हे साधकांचे मायबापच होत. श्री रामरायाची भक्ती करता करता रामाशी जे तादात्म्य त्यांनी गाठलं त्यामुळं, श्री महाराजांना ते आपले गुरूही वाटतात. म्हणून श्री महाराज मारुतिरायांना विनंती करतात की, माझा सांभाळ करा, मला माझं रामरायाचं ध्येय गाठून द्या.

.. ४..

मारुती माझा मायबाप ।
हरी भय आणि ताप ।।१।।

मारुती माझा दीनबंधु ।
उतरी पार भवसिंधु ।।२।।

मारुती माझा गुरु आता ।
जन्मोजन्मी मातापिता ।।३।।

दास म्हणे मारुतिराजा ।
करा प्रतिपाळ (अहो) माझा ।।४।।

– श्री गोंदवलेकर महाराज

(ट्रॅक नं. ०६२)

माणसाच्या मनाची काही वैशिष्ट्यं आहेत. ते परमार्थाला अनुकूल करून घ्यायचं असेल तर, त्याच्या या वैशिष्ट्यांचा आपल्याला खुबीनं वापर करता यायला हवा. त्यातलंच एक वैशिष्ट्य आणि त्याचा खुबीनं वापर कसा करावा, त्याचा एक मार्ग या अभंगाच्या रूपानं श्री नामदेव महाराजांकडून आपण शिकू शकू. मनाचं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य आहे की, ते ज्या गोष्टीचं सतत ध्यान करीत राहतं, ज्यात ते सतत गुंतून राहतं, त्याचंच त्याला स्वरूप येतं, त्याचाच आकार ते धारण करतं. म्हणूनच या वैशिष्ट्याचा वापर करून त्याच मनाला भगवंताचं स्वरूप देणंही शक्य आहे. फक्त यात त्याच्या लक्षात आणून देणं भाग आहे की, इतर कुठं गुंतलं तर ते त्या गोष्टी बनेल. भगवंतातच गुंतून राहिलं तरच ते ध्येय ते गाठू शकेल. ही मनाची उमज मनाला पडावी आणि पर्यायानं आपल्यालाही ते कळावं आणि खऱ्या ध्येयाव्यतिरिक्त इतर कशात आपण गुंतू नये, एवढं तरी आपण यातून नक्कीच घेऊ शकू.

..५..

पृथ्वी ध्यासी तरी पृथ्वीची होसी ।
परि केशव न होसी अरे मना ।।१।।

आप ध्यासी तरी आपचि होसी ।
परि केशव न होसी अरे मना ।।२।।

वायु ध्यासी तरी वायुचि होसी ।
परि केशव न होसी अरे मना ।।३।।

आकाश ध्यासी तरी आकाशचि होसी ।
परि केशव न होसी अरे मना ।।४।।

नामा म्हणे जरी केशवासी ध्यासी ।
तरी केशवचि होसी अरे मना ।।५।।

– श्री नामदेव महाराज

(ट्रॅक नं. ०६३)

स्वत: थोर दत्तावतार असलेल्या श्री माणिकप्रभूंचं हे पद म्हणजे अनेक दुर्मीळ गोष्टींचा मनोज्ञ संगम आहे. एकतर श्री माणिकप्रभू स्वत: थोर दत्तभक्त असून साधकांना रामाला शरण जायला सांगतात, हे केवळ साधकांच्या मनात कुठं द्वैत भाव, तरतमभाव असेल तर तो दूर करण्यासाठी, सर्वत्र एकच भगवंत नटलेला आहे हा भाव जागवण्यासाठी. दुसरं असं की, ज्याचं आपण भजन करतो त्या भगवंताशी तादात्म्य होऊन ते करणं आपण शिकलं पाहिजे, हेही ते सुचवतात आणि तेही भगवंताला विसरून भजन करणाऱ्यांसाठी मार्गदर्शक आहे, त्यांना सावध करणारं आहे. तिसरं असं की, भगवंत जोडेल तो आचार, त्याव्यतिरिक्त तो दुराचारच समजावा आणि अर्थातच तो टाळावा. चौथं असं की, आपल्या मार्गात गुरूची अपरिहार्यता ओळखावी आणि अखेरचं म्हणजे खरा राम हा आत्मारामच, त्याला मात्र सदैव जपावं.

..६..

राम होउनि राम गा रे ।
रामासी शरण रिघा रे ।।धृ।।

कोण कैचा हे विचारा ।
नका कर्म करू व्यभिचारा ।।१।।

हा दुस्तर भव हराया ।
तुम्ही जोडा सखा गुरुराया ।।२।।

म्हणे माणिक निज राम पहावा ।
तयालागी हृदयीच जपावा ।।३।।

– श्री माणिक प्रभू

(ट्रॅक नं. ०६४)

श्री गोंदवलेकर महाराज हे आयुष्यभरात अक्षरश: लक्षावधी लोकांच्या संपर्कात आले. हजारो शब्दांनी त्यांनी उपदेश केला. पण त्या साऱ्याचं सार 'नाम घ्या' हेच होतं, असं म्हणता येईल. त्याच नामाची महती या अभंगात गाताना ते काही वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी मांडतात. नाम हे साधारणत: भगवंतप्राप्तीचं साधन मानलं जातं. पण श्री महाराजांची त्या नामावर एवढी निष्ठा आहे की, ते नाम हेच त्यांना साध्य वाटतं. म्हणजेच मुखात नाम येणं, हेही खूपच साधनेचं फळ आहे, असं त्यांना वाटतं. कितीही प्रकारचे जप, तप, अनुष्ठान, मंत्र–मंत्रावळी केल्या तरी शेवटी रामनामावर, भगवन्नामावर आणि त्याच्या स्मरणावरच यायला लागतं, हे त्यांनी परोपरीनं या अभंगात सांगितलं आहे. साऱ्या सारांचं सार आणि साऱ्या विश्वाचा आधार असलेल्या या नामाशिवाय साधकांना दुसरी गतीच नाही, दुसरा मार्गच नाही हे श्री महाराज मोठ्या तळमळीनं सांगतात, हे साधकांनी हृदयात कोरून ठेवण्यासारखं आहे.

..७..

सकळ साधनांचे फळ ।
रामनामचि केवळ ।।धृ।।
जप तप अनुष्ठान ।
अंती नामचि प्रमाण ।।१।।
नाना मंत्र मंत्रावळी ।
सोडवीना अंतकाळी ।।२।।
महापातकी पतित ।
नामे तरले अनंत ।।३।।
नाम साराचेही सार ।
नाम सकळांसी आधार ।।४।।
दास म्हणे सांगू किती ।
नामाविणे नाही गती ।।५।।

– श्री गोंदवलेकर महाराज

(ट्रॅक नं. ०६५)

आपला नेहमीचा सारा प्रपंच हाच परमार्थ करायची अमूल्य विद्या ज्यांना साधली, असे थोर गृहस्थाश्रमी सत्पुरुष श्री एकनाथ महाराज यांचा हा अभंग दोन महत्त्वाच्या गोष्टींवर प्रकाश टाकतो. पहिली गोष्ट म्हणजे, आपली सारी पारमार्थिक साधनं, उदाहरणार्थ, इथं उल्लेखलेली संध्या, स्नान, तप, अनुष्ठानं इत्यादी साधनं एका वेगळ्या पद्धतीनं एका गुरुनिष्ठ साधकाला करता येणं शक्य आहे. ते कसं करता येणं शक्य आहे किंवा विशेषत: त्यांनी स्वत: ते कसं केलं, हे या अभंगातून कळतं आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, जर आपण खरोखरच सद्गुरूंवर निष्ठा ठेवून आपली सारी कर्मं, उपासना करत असू तर, त्या मार्गानंसुद्धा गुरूंशी तद्रूप, तदाकार होऊ शकू, आणि अशा तद्रूप होण्यानं हा आपला नेहमीचा प्रपंचच आपल्याला ब्रह्मरूप आणि आनंदरूप दिसू लागेल. म्हणजे आपण इथंच जीवनमुक्त अवस्था अनुभवू शकतो. आणि नाथांच्या सांगण्याचं प्रधान वैशिष्ट्य हे की, ही त्यांची स्वत:ची स्थिती आहे ! त्यांचा स्वत:चा अनुभव आहे ! त्यामुळंच साधकांच्या दृष्टीनं इतर कोणत्याही शास्त्र–मार्गापेक्षासुद्धा, हा प्रत्यक्ष अनुभवाचा अभंग अधिक मोलाचा, उपयुक्त आणि मार्गदर्शक आहे.

..८..

तुमचे नामसंकीर्तन ।
हेचि माझे संध्यास्नान ।।१।।

तुमचे पायांचा साक्षेप ।
हाचि माझा कालक्षेप ।।२।।

तुमचे पायांचे वंदन ।
हेचि माझे अनुष्ठान ।।३।।

तुमचे पायापाशी निद्रा ।
हेचि माझी प्रेममुद्रा ।।४।।

एका जनार्दनाकार ।
ब्रह्मरूप हा संसार ।।५।।

– श्री एकनाथ महाराज

(ट्रॅक नं. ०६६)

कर्नाटकातील थोर सत्पुरुष श्री ब्रह्मानंद यांनी त्यांचे गुरू श्री गोंदवलेकर महाराज यांना एक देहधारी मनुष्य म्हणून कधी पाहिलंच नाही. त्यांच्या दृष्टीनं ते भगवंतच होते. म्हणून या कन्नड पदामध्ये ब्रह्मानंद अखेरीस म्हणतात, मी उच्चरवानं सांगतो की, श्री महाराज हे सामान्य माणूस नव्हेत. महाजरु मनुजरल्ला. पण आपल्या गुरूंकडं पाहायची ही दृष्टी यायला काय करायला हवं, ते या पदात ते आधी सांगतात. त्यातली दोन सूत्रं महत्त्वाची – एक सतत विवेकानं वागणं आणि दुसरं सतत परमार्थ जगणं. विवेकामुळं एरवी मनाला भ्रमवणाऱ्या जमीनजुमला, पैसाअडका असल्या गोष्टींची भूल पडत नाही. माणूस शाश्वत सुखाकडं वळतो आणि ते देऊ शकणाऱ्या भगवंताकडं आणि गुरूंकडं वळतो. सतत परमार्थात राहाणं म्हणजे विवेकानं मिळवलेली ही दृष्टी स्थिर राहून तशीच सतत कृती होणं, दोन्हीही आपल्याला शिकण्यासारखी आहेत.

..९..

विवेक विल्लद जन्मउ व्यर्थ ।
सदा परमार्थ माडले बेकु ।।१।।

परमार्थदन्था सुखउ एल्लियु इल्ला ।
प्रपंचविदेल्ला मायारूपा ।।२।।

मायारूप मत्ते मण्णु हेण्णु होन्नु ।
अनुभवकण्णु नोडुवदु ।।३।।

नोडुवदु रामन स्वरूपवन्नु ।
गुरुकृपेयन्नु पडेदमेले ।।४।।

ब्रह्मानंद जनरिगे सारि हेळुवरू ।
महाजरु मनुजरल्ला ।।५।।

– श्री ब्रह्मानंद

मराठी गद्य भावार्थ

विवेकाशिवाय जन्म व्यर्थ आहे. नेहमी परमार्थ केलाच पाहिजे.१. परमार्थासारखे सुख कोठेही नाही सर्व प्रपंच मायात्मक आहे.२. जमीन , स्त्री , पैसा हे सर्व मायिक आहे. अनुभवाच्या दृष्टीने पाहिले पाहिजे.३. गुरुकृपा प्राप्त झाल्यावर रामरायाचे स्वरूप पाहता येईल.४. ब्रह्मानंद लोकांना पुनः पुनः सांगतो आहे की, महाराज मनुष्य नाहीत.५.

(ट्रॅक नं. ०६७)

परमार्थात उदंड कष्ट करणाऱ्यांची काही उणीव नाही. पण सर्वांनाच काय, थोड्याफार जणांनासुद्धा परमार्थाचं ध्येय – जो भगवंत किंवा शाश्वतचा आनंद – तो मात्र मिळाल्याचं दिसत नाही. याचं कारण उदंड कष्टाची उणीव नसली तरी, योग्य आणि आवश्यक त्या कष्टांची मात्र उणीव जरूरच आहे. जटा वाढवणं, भस्म लावणं, कंदमुळांवर राहणं, उपासतापास व्रतवैकल्यं करणं, मंदिरात जाणं, पूजाअर्चा करणं – हे सारं उदंड आहे. नित्यनेमानं घडतं आहे. पण परिणामी, माणूस मुक्त होणं, त्याचं मन भ्रमापासून मोकळं होणं, त्याला भगवंताचं दर्शन होणं – यांतलं काही घडताना मात्र दिसत नाही.

हे या पदात सांगून राजस्थानातले सत्पुरुष श्री ब्रह्मानंद पुढं म्हणतात की, ते घडण्यासाठी, आवश्यक ते योग्य आणि मुक्तिकारक ज्ञान आणि ते देऊ शकणारे सद्‌गुरू यांची कास धरली पाहिजे. सद्‌गुरूंना शरण जावं, खऱ्या मन:पूर्वक सेवेनं त्यांना प्रसन्न करून घ्यावं, म्हणजे हा भवपाश तुटेल, कर्मकांडं सुटतील आणि भ्रम मिटेल आणि आपण मुक्त होऊन खरा आनंद मिळवू शकू, अशी खात्री त्यांनी या पदात दिली आहे.

..१०..

अगर है ज्ञान को पाना ,
तो गुरु की जा शरण भाई ।।धृ।।

जटा सिर पर रखाने से,
भसम तन में रमाने से ।
सदा फलमूल खाने से,
कभी नहिं मुक्ति को पाई ।।१।।

बने मूरत पुजारी है,
तीरथ यात्रा पियारी है ।
करें ब्रत नेम भारी है,
भरम मन का मिटे नाहीं ।।२।।

कोटि सूरज शशि तारा,
करें प्रकाश मिल सारा ।
बिना गुरु घोर अंधियारा,
न प्रभु का रूप दरसाई ।।३।।

ईश सम जान गुरुदेवा,
लगा तनमन करो सेवा ।
'ब्रह्मानंद' मोक्ष पदमेवा,
मिले भवबंध कट जाई ।।४।।

– श्री ब्रह्मानंद, पुष्कर

(ट्रॅक नं. ०६८)

साधना करण्याविषयी प्रत्येकाच्या काही कल्पना असतात. साधनेमध्येसुद्धा माणसाची प्रपंचाची सवय आणि स्वभाव व्यक्त होतो. प्रपंचात काही मिळवायचं झालं तर, खूप कष्ट करावे लागतात. तीच गोष्ट भगवंत मिळवण्याच्या बाबतीत, साधनेत असते. अशी अनेकांची नकळत समजूत असते. इतकंच काय, काही साधी सोपी साधना सांगितली तर, अनेकांना ती अळणीही वाटते. किंबहुना ती प्रभावी ठरणार नाही, असं वाटतं. तर अनेकांना प्रपंचात जसा सारखा बदल, नावीन्य लागतं तसंच ते साधनेतही असावं, असंही वाटतं. पण या साऱ्याची भगवंताला खरंच अपेक्षा असेल का, याचा साधा विचारही अनेकांच्या मनात येत नाही. या पार्श्वभूमीवर पाहिलं तर 'नाम' हे साधं, इतकं निरुपाधिक आणि सोपं असूनही साधन म्हणून अवघड का झालं आहे, हे लक्षात येऊ शकतं.

अशा वेळी इथं घेतलेला संत श्री सेना महाराजांचा अभंग लक्षणीय आहे.ते खात्रीनं सांगतात की, जिथं असाल तिथं नाम घ्या, नामांचंच चिंतन करा.भगवंताच्या प्राप्तीला, तो धावून यायला हे आणि एवढंच साधन पुरेसं आहे. साधनेची आटाआटी करण्याची सवय लागलेल्यांना हे कदाचित अविश्वसनीय वाटेल. पण हे लक्षात घ्यावं की, सेना महाराजांसारखे संत स्वानुभवानं प्रतिज्ञेवर आणि उच्चरवानं सांगत आहेत. शुद्ध आणि सोप्या परमार्थाची आवड असलेल्या साधकांना हा अभंग खचितच मोलाचा वाटेल.

..११..

असाल तेथे नामाचे चिंतन ।
याहुनि साधन आणिक नाही ।।१।।

सोडवील माझा भक्ताचा कैवारी ।
प्रतिज्ञा निर्धारी केली आम्ही ।।२।।

गुणदोष याती न विचारी काही ।
धावे लवलाही भक्तकाजा ।।३।।

अवघे काळी वाचे म्हणा नारायण ।
सेना म्हणे क्षण जाऊ न द्या ।।४।।

– श्री सेना महाराज

(ट्रॅक नं. ०६९)

अनेकांची कल्पना अशी आहे की, परमार्थ हा भोंगळ आणि अनिश्चित स्वरूपाच्या कल्पनांनी भरलेला आहे. वस्तुस्थिती तर तशी नाहीच पण, या अभंगामध्ये श्री नामदेव महाराज स्वत: जगलेल्या या परमार्थ मार्गाचा स्वत: अनुभव घेऊनच पहा, असा आग्रह धरतात, हे लक्षात घेण्यासारखं आहे.

मायामोहात गुरफटून जाऊन आपण अकारणच आपल्या स्वहिताचा घात करतो. म्हणून सर्वांनी समविचारी साधकांनी एकत्र येऊन आपल्या स्वहिताचा सतत विचार जागवण्याची आणि यासाठी निरंतर प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यासाठी नाम आणि सत्संग ही दोन फलदायी साधनं आपलं प्रपंचाचं काम करता करतासुद्धा कशी साधता येतील, हे या अभंगात श्री नामदेव महाराज आवर्जून सांगत आहेत.

..१२..

अवघे निरंतर करा हा विचार ।
भवसिंधूचा पार तरिजे केवी ।।१।।
अवघे जन्म वाया गेले विषयसंगे ।
भुललेती वाउगे मायामोहे ।।२।।
अवघा वेळ करिता संसाराचा धंदा ।
वाचे वसो सदा हरिचे नाम ।।३।।
अवघ्या भावी एका विठ्ठलाते भजा ।
आर्ते पूजा करा हरिदासाची ।।४।।
अवघे सुख तुम्हा होईल अपैते ।
न याल मागुते गर्भवासा ।।५।।
नामा म्हणे अवघे अनुभवोनि पहा ।
सर्वकाळ राहा संतसंगे ।।६।।

– श्री नामदेव महाराज

अपैते – स्वाधीन

(ट्रॅक नं. ०७०)

सर्वसामान्य माणसाची बरीचशी सुखदुःखं ही देहावर आणि त्याला चिकटून वावरणाऱ्या 'मी'ला धरूनच विचार करणाऱ्या देहबुद्धीवर अवलंबून असतात, असं आढळतं. स्वतःला, स्वतःच्या देहाला सुखावणारं झालं की, त्याला बरं वाटतं. त्याला त्रास देणारं वाटलं की, त्याच्या दृष्टीनं ते दुःखाचं ठरतं, नकोसं होतं. त्याच्या आयुष्यातला कितीतरी बहुमूल्य वेळ या देहाच्या सुखासाठी राबण्यात, त्या सुखाला उपयोगी पडतील अशा वस्तू, माणसं, विषय गोळा करण्यात जातो. पण मुळातच देह नाशिवंत, मर्यादित आणि त्याला धरून वावरणारा 'मी' ही संकुचित ! त्यामुळं इतकी उसाभर करूनही माणसाला काही सततचा आनंद मिळत नाही. उलट वारंवार दुःखालाच सामोरं जावं लागतं आणि अखेर तर, ज्या देह आणि देहबुद्धीला कुरवाळण्यात सारा जन्म जातो, तो देहच काळाच्या स्वाधीन करायची वेळ येते, आणि साऱ्याच प्रयत्नांची दिशा चुकल्यानं अतृप्त अवस्थेत पुढच्या जन्माची तरतूद करीत माणूस दुःखात जातो. सामान्य माणसाच्या या शोकांतिकेचं संतांना वाटणारं दुःख या अभंगात समर्थ रामदास स्वामींनी परखडपणे मांडलं आहे, तसंच देह देवाच्या कामी लावावा, असं सांगितलं आहे आणि ते साधकाला उद्‌बोधकच आहे.

..१३..

देहालागी कष्ट केले ।
परि ते अवघे व्यर्थ गेले ।।१।।

देह देवाचे कारणी ।
होता देव होतो ऋणी ।।२।।

प्राणी लोभे गुंडाळला ।
पुढे अंतकाळ आला ।।३।।

जे जे काही कष्ट केले ।
ते ते अवघे व्यर्थ गेले ।।४।।

नाना परी सांभाळिली ।
पुढे काया हे जाळिली ।।५।।

दास म्हणे मूर्खपण ।
पुढे जन्मासी कारण ।।६।।

– श्री रामदास स्वामी

(ट्रॅक नं. ०७१)

आपल्या साधनेनं, गुरुभक्तीनं आणि अखंड वास्तव्यानं डव्हा या विदर्भातल्या छोट्याशा गावाला पंढरीचं पावित्र्य प्राप्त करून देणाऱ्या पूज्य श्री विश्वनाथ महाराजांचा हा अभंग म्हणजे, सद्‌गुरू आणि नाम यांची अलौकिक महती अधोरेखित करणारा दुर्मीळ प्रासादिक अभंगच होय.

मनुष्य तीर्थयात्रेला जातो, गंगास्नान करतो तो देह आणि मनानं पवित्र व्हावं म्हणून, शुद्ध व्हावं म्हणून ! पण यापलीकडंही पावन करणारं एक तीर्थ विश्वनाथबाबा आपल्या अनुभवानं आपल्याला दाखवतात ते म्हणजे, सद्‌गुरुचरण आणि गुरुदत्त भगवंताचं नाम ! गुरूंनी दाखवलेल्या सन्मार्गानं जो सतत वाटचाल करील आणि मुखात मनापासूनचं बळकट नाम ठेवील तर, तीर्थस्नान करून पावन व्हावं, त्यापलीकडं तो पावन होईल.

..१४..

गुरुपायी सर्व तीर्थ ।
नाम मुखात समर्थ ।।१।।

तेव्हा घडे गंगास्नान ।
देह शुद्ध होई मन ।।२।।

पाहिला देव सर्व तीर्थी ।
भक्तिज्ञानाची निर्मिती ।।३।।

विश्वनाथा घडले स्नान ।
गुरुनामाचे स्मरण ।।४।।

– श्री विश्वनाथ महाराज

(ट्रॅक नं. ०७२)

परमार्थात साधनं तर अनेक आहेत. ती आपापल्या परीनं मोठीही आहेत. पण एक गुरुनिष्ठेचं साधन करून मुक्त होणारे डव्ह्याचे थोर सत्पुरुष पूज्य विश्वनाथ बाबा हे आजच्या काळातले एक अलौकिक गुरुभक्त म्हणावे लागतील. साक्षात्कारी संत श्री नाथनंगेबाबा यांचे ते शिष्य होत. विश्वनाथ बाबांनी आपल्या या गुरूंविषयी व्यक्त केलेला भाव इतका उत्कट आहे की, कोणत्याही शिष्याला तो भाव आपल्या गुरूंबद्दल आदर्श वाटावा. ते म्हणतात, मला गुरूशिवाय दुसरा देव आढळत नाही. त्याच्या पायाशी एकनिष्ठपणे राहणं, हेच माझं साधन आहे. कुठलाही भेदभाव न बाळगता सर्व जिवांवर अपार प्रेम करणारा गुरू खऱ्या अर्थानं ज्ञानी होय. पापी माणसाचा उद्धार करून त्याच्या अंतरंगात नाम दृढ करणं, हा त्याच्या कृपेचा अलौकिक आविष्कार होय. म्हणून गुरुभक्ती हेच साधन मानणाऱ्यानं, गुरू हाच देव समजून त्याच्या पायाशी सर्व सुख असल्याची नि:संशय खात्री बाळगावी आणि त्यानं दिलेल्या साधनात रहावं, हेच कल्याणाचं ठरेल.

..१५..

गुरुवीण दुजा सापडेना देव ।
ठेवा सत्यभाव गुरुपदी ।।१।।

गुरु दयावंत राजा ज्ञानियांचा ।
सकळ जीवांचा प्रेमी असे ।।२।।

गुरु करी कृपा पातकी उद्धरी ।
वसवी अंतरी नाम त्याच्या ।।३।।

म्हणे विश्वनाथ गुरु देव एक ।
गुरुपायी सुख सर्व आहे ।।४।।

– श्री विश्वनाथ महाराज

(ट्रॅक नं. ०७३)

भगवंत मिळवावा असं अनेक जिज्ञासू साधकांना वाटतं, अगदी प्रामाणिकपणे वाटतं. पण त्यासाठी योगयाग, यात्रा, अनुष्ठानं असं काहीतरी मोठं कष्टाचं, त्रासाचं केल्याशिवाय भगवंताची प्राप्ती होणार नाही, असं वाटून त्याचं मन तिकडं ओढ घेतं. पण माणसाची खरी कुवत, त्याची खरी गरज हे सारं लक्षात घेऊन आत्मानुभवी संत जे सांगतात, तेच करणं अशा वेळेला आपल्या हिताचं ठरेल असं सुचवावंसं वाटतं.

अशाच एका आत्मानुभवी सत्पुरुषाचा सल्ला या अभंगातून आपल्याला मिळतो आहे. आणि तो आपण ऐकावा असाच आहे. हे थोर सत्पुरुष निरंजन रघुनाथ म्हणतात, आपल्याला भक्तिमार्गच बरा. या भक्तिमार्गाची रूपरेषाच या अभंगात पुढं दिलेली आहे, आणि हेही आवर्जून सांगितलं आहे की, या मार्गात यायला, टिकायला अनिवार्य असा सत्संग आपण रात्रंदिवस मिळवीत रहावं ! हे सारं आपण सदैव मनात जपण्यासारखं आहे.

..१६..

हरिची भक्ती बरी, भक्ती बरी ।
तारक भवसंसारी ।।धृ।।

सर्वांतरी हरि पहावा ।
अंतरी निश्चय भाव धरावा ।।१।।

हरीचे सद्‌गुण गावे ।
प्रेमळ वचनाने आळवावे ।।२।।

विषयभोग विसरावे ।
निरंजन भक्तीने भजावे ।।३।।

निशिदिनी सत्संगासि धरावे ।
भवजळि रितिने याचि तरावे ।।४।।

– श्री निरंजन रघुनाथ

(ट्रॅक नं. ०७४)

तसं सारं जग द्वैताचा पसारा आहे. अनेक मार्गांनी माणसाला हे द्वैत अनुभवायला येतं. खरं–खोटं, होय–नाही, योग्य–अयोग्य, जाणं–येणं, घडणं–बिघडणं, असंख्य मार्गांनी मनुष्य सतत द्वैतात वावरत असतो. त्यातलंच सामान्य माणसापासून थोरामोठ्यांपर्यंत सर्वांच्या वाट्याला येणारं द्वैत म्हणजे, निर्णयाच्या बाबतीत द्विधा होणं ! करावं की, करू नये, बोलावं की, बोलू नये, जावं की, जाऊ नये – अशा अनेक बाबतींत माणूस द्विधा होतो आणि त्याला कात्रीत धरल्यासारखा अनुभव नेहमी येतो. अशा वेळी स्वत:च्या मतानं काही ठरवावं, तर दुर्दैवानं अनेकदा ते चुकीचं ठरतं. ही सारी अवस्था अनुभवून, या अभंगात श्री तुकाराम महाराज अखेर निर्णय मांडतात की, भगवंताला स्मरून निर्णय घेणं, हेच सार म्हणून सांगता येईल. त्याच्या अनुसंधानात रहाणंच उत्तम, हिताचं आणि योग्य. भगवंताचा मार्ग डोळ्यांसमोर ठेवून त्यानुसार चालणंच साधकाला उचित ठरेल.

..१७..

जाणावे ते काय नेणावे ते काय ।
ध्यावे तुझे पाय हेचि सार ।।धृ।।

करावे ते काय न करावे ते काय ।
ध्यावे तुझे पाय हेचि सार ।।१।।

बोलावे ते काय न बोलावे ते काय ।
ध्यावे तुझे पाय हेचि सार ।।२।।

जावे ते कोठे न जावे ते आता ।
बरवे आठविता नाम तुझे ।।३।।

तुका म्हणे तू करिसी ते सोपे ।
पुण्ये होती पापे आमुच्या मते ।।४।।

– श्री तुकोबा

बरवे – चांगले, श्रेष्ठ

(ट्रॅक नं. ०७५)

चोख व्यवहारवाद मांडणारे, मोठमोठे मठ, चळवळी उभ्या करणारे, आध्यात्मिक जनजागरण करणारे, भक्तिपंथाचं नेतृत्व करणारे आणि राजकारणही जाणणारे श्री समर्थ रामदास स्वामी दुसऱ्या बाजूला उपास्य देवतेसाठी व्याकुळ होत असतील, एखाद्या मृदू किंवा हळव्या हृदयाच्या भक्तासारखे तळमळतील अशी कल्पनाही एरवी आपल्याला येत नाही. पण त्यांच्या व्यक्तित्वाची ही अत्यंत हृद्यआणि तळमळीची बाजू या पदात प्रतिबिंबित झाली आहे. श्रीराम ही माझी माउली मला कधी भेटेल, असं ते आर्ततेनं म्हणतात. त्यांनी मांडलेल्या या विशाल प्रपंचातलं हृदयीचं दुःख त्यांना रामाच्या कानी घालायचं आहेच, पण त्यासाठी ते किती आतुर झाले आहेत, हे त्यांच्याच शब्दात ऐकण्यासारखं आहे. निर्गुणात स्थिरावलेल्या सत्पुरुषालासुद्धा असलेलं हे सगुणाचं, भेटीचं, मन मोकळं करण्याचं वाटणारं प्रेम मोठं हृद्य वाटतं. सामान्य साधकाला त्यामुळं स्वामींची जवळीक साधता येते.

..१८..

राम माझी माय , कई भेटईल ।
वोरसे देईल आलिंगन ।।१।।

संसाराचे दु:ख दाटले मानसी ।
ते मी तुजपाशी सांगईन ।।२।।

उतावीळ चित्त उभारूनि बाहे ।
रामदास पाहे वाट तुझी ।।३।।

– श्री रामदास स्वामी

वोरसे – प्रेमभराने

(ट्रॅक नं. ०७६)

श्री सीताराम महाराज उर्फ धाकटे टेंब्ये स्वामी यांचं हे अमोल पद आहे. सामान्य माणसाला सावध करून, या पदामध्ये सीताराम महाराज त्याला सत्संगाचं महत्त्व जाणवून देत आहेत.सत्संगाबद्दलच्या आणि साधनेतल्या आपल्या विविध कर्तव्यांची स्पष्ट जाणीवही हे पद आपल्याला देऊन जातं. त्यामध्ये दुर्जनांची संगती कटाक्षानं टाळावी, विषयांपासून दूर रहावं, सद्‌गुरूचरणी लीन रहावं, मनाला वळण देऊन उन्मन करावं आणि विविध विकारांच्या आणि अहंभावाच्या ग्रंथींचा भेद करून हृद्‌ग्रंथी तोडाव्या – इत्यादी भक्ताला उपयुक्त असे, निश्चित स्वरूपाचे आदेशही या पदात मिळतात. हे सारं स्वत: श्री सीताराम महाराजांनी जगून दाखवलेलं असल्यानं, या आदेशांना मोठं वजन प्राप्त झालेलं आहे.

..१९..

संत समागम जोड । मनुजा ।।धृ।।

उत्तम जन्मा येउनि प्राप्या ।
दुर्जन संगति सोड ।।१।।

विषयविषाते न करी प्राशन ।
अंतक मोडिल खोड ।।२।।

सद्‌गुरुचरणी लीन होशी तरि ।
फेडिल मनिचे कोड ।।३।।

मन हे उन्मन करुनि पहासी ।
उगवे चिन्मय मोड ।।४।।

सीतारामी शरण होउनी ।
हृद्‌ग्रंथीते तोड ।।५।।

– श्री सीताराम महाराज

(ट्रॅक नं. ०७७)

माहुलीचे थोर सत्पुरुष आणि सद्‌गुरू राजाराम महाराज यांचे शिष्य श्री कृष्णदास महाराज यांचं हे एक अर्थगर्भ पद आहे. त्यातून साधकांना अनेक मौलिक सूचना मिळतात.

आपण अनेकदा हे ऐकतो की, उपासना शक्यतो गुप्त ठेवावी, प्रकट करू नये आणि ते बरोबरही आहे. पण इथं मात्र धृपदातच कृष्णदास महाराज म्हणतात की, उपासना प्रकट झाली तरच भक्ती परिपूर्ण झाली, असं म्हणता येईल. अर्थात हे उपासनेचं प्रकट होणं इथं वेगळ्या अर्थानं आहे. ते म्हणजे उपासना अमलात येणं म्हणजे भगवंताजवळ असण्याची स्थिती प्रत्यक्षात येणं किंवा भगवंताजवळ असल्यासारखं प्रत्यक्ष वर्तन होणं. आणि ही अर्थातच भक्तीची पूर्णावस्थाच आहे. अशा खऱ्या उपासनेच्या आधारानंच मनुष्य जन्मात खरा यशस्वी होतो. साधकांसाठी ते पुढं ते एक गुरूपदिष्ट त्रिसूत्री देतात जी अत्यंत सुबोध आणि संस्मरणीय आहे. साधकानं भजन, साधन, अभ्यास या तीन गोष्टींची कास धरली तर, त्याला भगवंत अवश्य गाठता येईल. शेवटी ते निर्वाणीचा आणि महत्त्वाचा सल्ला देतात की, हे सारं साध्य करायला नामावर दृढ विश्वास ठेवा. साधकांना श्री कृष्णदास महाराजांचं हे सारंच सांगणं तळमळीचं आणि अनुकरणीय वाटेल.

..२०..

उपासना प्रकट झाली ।
तरिच भक्ती फळा आली ।।१।।

उपासना हाचि आश्रय ।
जाई तिकडे पावे जय ।।२।।

भजन साधन अभ्यास ।
येणे पावे परलोकास ।।३।।

राजारामदास म्हणे ।
नामी विश्वास धरणे ।।४।।

– श्री कृष्णदास महाराज

(ट्रॅक नं. ०७८)

माणसानं प्रपंच नेटका करून परमार्थ करावा, हा अनेक सत्पुरुषांनी सांगितलेला रास्त आणि व्यवहार्य मार्ग आहे. सामान्य माणसाच्या दृष्टीनं तो अगदी मध्यम आणि हिताचा मार्ग होय, हेही खरंच. पण या मध्यम मार्गानं चालतानासुद्धा एक अवस्था अशी येते की, भक्ताला वाटतं की बस्स! आता प्रपंचाचा धंदा पुरे झाला ! त्या प्रपंचाला भिऊन, घाबरून खूप काळ आपण काढला. आता तो सारा प्रपंच, ती सारी चिंता भगवंतावर सोपवून केवळ त्याच्याच नामस्मरणात आपण जगावं. मनाची आतून तेवढी तयारी झाल्यावर येणारा अनुभव श्री तुकोबा इथं अभंगात सांगत आहेत. आता भगवंतच आपलं, आपल्या प्रपंचव्यवहाराचं रक्षण करणार , या खात्रीनं आता त्याच्याच स्मरणात आपलं उरलेलं आयुष्य आपण घालवू या, हा निर्धार ते कोणत्या शब्दांत व्यक्त करतात, ते मोठं पाहाण्यासारखं आहे.

..२१..

असो आता ऐसा धंदा ।
तुज आठवू (आळवू) गोविंदा ।।धृ।।

रक्षिता तू होसी जरी ।
तरी काय येरी करावे ।।१।।

काया वाचा मन पायी ।
राहे ठायी करू ते ।।२।।

तुका म्हणे गाईन गीती ।
रूप चित्ती धरूनिया ।।३।।

– श्री तुकोबा

(ट्रॅक नं. ०७९)

श्री गोंदवलेकर महाराज यांनी देह ठेवण्याच्या आदल्या दिवशी शेवटचं कीर्तन केलं. त्या कीर्तनाच्या अखेरीला जो अभंग त्यांनी गायला त्याला त्यांचा शेवटचा अभंग या कारणासाठी ऐतिहासिक महत्त्व तर आहेच, पण नामावरची निष्ठा त्यांनी त्यांच्या शेवटच्या श्वासापर्यंत कशी सांभाळली, यासाठीही या अभंगाला महत्त्व आहे. ही एक अत्यंत भावपूर्ण रचना आहे. आयुष्यभर लोकांच्या कल्याणासाठी ते झटले, नामासाठी ते जगले, शेवटच्या भजनातसुद्धा लोकांच्या कल्याणासाठी त्यांनी लोकांना एक वेळ तरी राम राम म्हणा, अशी काकुळतीची विनंती केली. वारंवार सांगितलं की, इतके कष्ट करूनही दु:खात जगता मग इतकं सोपं सुखाचं नाम घेऊन आनंदात का बरं जगत नाही ? त्यांची ही कळकळ आपल्यावर खचितच परिणाम घडवील.

..२२..

भजनाचा शेवट आला ।
एक वेळ राम राम बोला ।।१।।

आज पुण्य पर्व काळ ।
पुन्हा नाही ऐशी वेळ ।।२।।

राम राम वाचे बोला ।
आज सुखामाजी डोला ।।३।।

दीनदास सांगे निका ।
रामनाम स्वामीशिका ।।४।।

– श्री गोंदवलेकर महाराज

(ट्रॅक नं. ०८०)

भगवंताचं प्रेम एकदा भक्ताला लागलं की, त्याच्या सहवासाची ओढ त्याला स्वस्थ बसू देत नाही. त्याला वाटतं की, काही तरी निमित्त करावं पण त्याच्याकडं जावं, भगवंताच्या जवळ रहावं. फक्त हे सर्वांनाच वाटत असलं तरी, कुठल्याही नात्यानं, कुठल्याही हलक्यासलक्या कामाच्या निमित्तानं किंवा भगवंत ठेवील तशा पद्धतीनं किंवा ठेवील तशा स्थितीत भगवंताचं व्हायची तयारी मात्र खऱ्या भक्ताचीच असते. ती काही औरच म्हणावी लागेल. दगड केलास तरी तुझ्या दारातली पायरी होऊन राहायची माझी तयारी आहे, असं या अभंगात सुरुवातीला श्री नामदेव महाराज म्हणतात ते लक्षात घेण्यासारखं आहे. अगदी जड क्षुद्र मानलेल्या अशा दगडासारख्या वस्तूबरोबरच इतर कमी महत्त्वाच्या मानलेल्या लाकूड, वृक्ष, पक्षी, पशू या बरोबरच, भगवंताचं कीर्तन करू शकणाऱ्या मनुष्यापर्यंत मला काहीही केलंस तरी तुझ्याजवळ मला ठेव, ही अनन्यता आणि त्यागाची आणि मीपणा विसरायची तयारीही साधकांना मोठी प्रेरक वाटेल. यातून ही भूमिका आपण समजून घेतली, जपली तर, आपलीही साधनेतली तयारी एक पाऊल पुढं जाऊ शकेल.

..२३..

देवा तुझे द्वारी ।
वसो ऐसे करी ।।धृ।।

पाषाण करिसी तरी ।
पायरीचेनि मिषे ।।१।।

काष्ठ करिसी तरी ।
स्तंभाचेनि मिषे ।।२।।

वृक्ष करिसी तरी ।
तुलसीचेनि मिषे ।।३।।

पक्षी करिसी तरी ।
शुकाचेनि मिषे ।।४।।

श्वान करिसी तरी ।
उच्छिष्टाचे मिषे ।।५।।

नामा म्हणे मज ।
कीर्तनाचे मिषे ।।६।।
(भजनाचे मिषे)

– श्री नामदेव महाराज

मिषे – निमित्ताने

(ट्रॅक नं. ०८१)

साधनेमध्ये भगवंताकडचा प्रवास जितक्या तळमळीनं आणि गतीनं होत राहतो, तितके तितके मनाचे इतर व्यापार हळूहळू आवरात येतात आणि मनानं सारखा चाललेला 'मी आणि माझा' ठेका बंद होतो. मनाच्या आतबाहेर तू आणि तू –भगवंत– हाच विषय होऊन बसतो. अखेर सारंच हरिमय होतं. ही मनोज्ञ अवस्था या अभंगामध्ये संतकुळीची माउली श्री ज्ञानेश्वर महाराज मांडीत आहेत. हरिमय झालेल्या मनाला आता सुरुवातीला, शेवटी, इथे तिथे, क्रियाकर्मांत, बोलण्यात चालण्यात सर्वत्र भगवंतच दिसू लागला आहे. आता तर भगवंत नाही अशी जागाच मला दिसत नाही, असं ज्ञानेश्वर माउली म्हणतात. ते हेही आवर्जून सांगतात की, संतांच्या संगतीमुळेच हा भगवंत, हा ब्रह्मानंद मला अनुभवायला मिळाला आहे. आतबाहेर भगवंताच्या, सद्गुरूच्या आणि नामाच्या प्रेमानं कसं भरून जावं आणि त्यासाठी संतसंगतीत कसं राहावं, हे या अभंगात शिकण्यासारखं आहे.

..२४..

हरि आला रे हरि आला रे ।
संतसंगे ब्रह्मानंदु जाला रे ।।१।।

हरि येथे रे । हरि तेथे रे ।
हरिवाचूनि न दिसे रिते रे ।।२।।

हरि पाही रे । हरि ध्याई रे ।
हरिवाचूनि दुजे नाही रे ।।३।।

हरि वाचे रे । हरि नाचे रे ।
हरि पाहाता आनंदु साचे रे ।।४।।

हरि आदि रे । हरि अंती रे ।
हरि व्यापकु सर्वाभूती रे ।।५।।

हरि जाणा रे । हरि वाना रे ।
बापरखुमादेविवरु राणा रे ।।६।।

– श्री ज्ञानेश्वर माउली

वाना – वर्णन, स्तुती करा

(ट्रॅक नं. ०८२)

श्री गोंदवलेकर महाराज यांचे थोर शिष्य श्री आनंदसागर यांचा हा अभंग म्हणजे नामनिष्ठा आणि गुरुनिष्ठा यांचा दुर्मीळ आणि पवित्र संगमच आहे. मनाला नामाची आणि सद्‌गुरुचरणाची गोडी कशी लागेल म्हणून तळमळणारे हे शिष्य श्री महाराजांचे अंतरंग शिष्य का झाले, याच्यावरही थोडातरी प्रकाश यामुळं पडतो. आनंदसागर म्हणतात, ज्यामुळं हृदयात राम आणि नाम स्थिर होतील असं काम कोणी मला पुरवील काय ? असं कुणी भेटलं तर मी त्याला साष्टांग नमन करीन आणि त्यांना मी माझे मायबापच समजेन, असं सांगताना पुढं माझे सद्‌गुरू माझे मायबापच झाले आहेत असं शेवटी सांगून, मोठ्या खुबीनं त्यांनी गुरूंच्या कृपेनं माझ्या हृदयात राम आणि नाम स्थिर झाल्याचं सुचवलं आहे. सद्‌गुरुचरणाचं हे प्रेम, नामासाठी तळमळणारं हे हृदय हे खऱ्या साधकांना अगदी प्रात:स्मरणीयच आहे. देवनिष्ठा, नामनिष्ठा आणि गुरुनिष्ठा यांचा आदर्श म्हणून कुठल्याही परंपरेच्या परमार्थमार्गी साधकाला हा अभंग संस्मरणीय वाटेल, यात शंकाच नाही.

..२५..

कैसी लागे मज या नामाची गोडी ।
पायाची आवडी रात्रंदिन ।।धृ।।

रात्रंदिन माझे चित्ती वसे राम ।
ऐसे कोणी काम पुरवावे ।।१।।

पुरवील काम तो माझे जीवन ।
तयासी नमन अष्टभावे ।।२।।

अष्टभावे तया नमन सर्वकाळ ।
जेणे घननीळ भेटवीला ।।३।।

भेटवीला सर्व जगाचा जिव्हाळा ।
तोही माझा झाला मायबाप ।।४।।

माझे मायबापा सद्‌गुरुसमर्था ।
तुझे चरणी माथा ठेवी हरी ।।५।।

– श्री आनंदसागर महाराज

(ट्रॅक नं. ०८३)

साधन करीत राहाणाऱ्या साधकाला तिचा परिणाम म्हणून काही प्रत्यय, काही अनुभव येत राहतात. हे स्वाभाविकच आहे. त्याच्याजवळ साधनेनं साधलेल्या गोष्टींची पुंजी गोळा होत जाते. पण या हिंदी पदामध्ये राजस्थानातले सत्पुरुष श्री ब्रह्मानंद, साधकाला सावध करून म्हणतात, 'जागा राहा रे बाबा' परमार्थमार्गामध्येसुद्धा विकारांची, लोभमोहाची वाटमारी सुरू असते. साधनेनं मिळवणं सोपं पण टिकवणं कठीण म्हणतात, तेही खरंच आहे. कारण थोडीशी साधना घडून काही साध्य झालं की त्याचा कुठं अभिमानच होतो, इतरांशी तुलना करून स्वत:ला श्रेष्ठ समजलं जातं, एखाद्या क्षुल्लक कामी साधना खर्ची घालायचा मोह होतो, लोकांनी दिलेल्या मानाला भुलायला होतं – हे सारे धोके साधनमार्गावरच्या मुसाफिराला कोणत्या क्षणी खाली आणतील, हे सांगता येत नाही. या मार्गावरचे शत्रू मोठे चलाख. तुम्हाला कोणतं प्रलोभन दाखवून बळी पाडतील हे सांगणं कठीण. अशावेळी ब्रह्मानंदांनी दिलेला सावधगिरीचा इशारा लक्षात ठेवून आपण राहिलो तर, स्वत:ला आणि आपल्या आध्यात्मिक प्रगतीच्या कमाईला सुरक्षित ठेवून भगवंताकडं यशस्वी वाटचाल करू शकू, असं म्हणावंसं वाटतं.

..२६..

मुसाफिर जागते रहना नगर में चोर आते हैं ।।धृ।।

संभालो माल अपने को
बांधकर धर सिराने में ।
जरासी नींद गफलत में
झपट गठडी उठाते हैं ।।१।।

कपट का है यहाँ चलना
सबी व्यापार दिनराती ।
दिखाकर मूरतें सुंदर
जाल में वो फसाते हैं ।।२।।

कबी किस का नहीं करना
भरोसा इस जगा दिल में ।
लगाकर प्रीत मतलब से
फेर पल में हटाते हैं ।।३।।

ठिकाना है नहीं कायम
किसी का इस सराये में ।
वो 'ब्रह्मानंद' दिनदिन में
सबी चलचल के जाते हैं ।।४।।

– श्री ब्रह्मानंद, पुष्कर.

सिराने में – वस्त्राच्या टोकाला, सराये में – धर्मशाळेत

(ट्रॅक नं. ०८४)

एकोणिसाव्या शतकातील थोर दत्तावतारी सत्पुरुष श्री माणिकप्रभु यांनी त्यांच्या लौकिक प्रपंचातून लहानपणीच बाहेर पडताना, त्यावेळी घडलेल्या तात्कालिक प्रसंगांच्या निमित्तानं केलेली ही रचना. ती रचना त्यांच्या पुढल्या अलौकिक लीलांची सुरुवात मानली जाते. आपल्या अलौकिक आणि अद्‌भुत जीवनाच्या सुरुवातीलाच त्यांनी हे निक्षून सांगितलं आहे की, भगवंतच साऱ्याचा सूत्रधार आहे आणि तोच साऱ्या जिवांचा तारणहार आहे. कर्तृत्वाच्या आणि मोठेपणाच्या ज्या गप्पा आपण करतो, त्या साऱ्या फोलच ठरतात. जो आपली मानवी काया मातेच्या उदरात नऊ महिने रक्षण करतो तोच ती काया पुढं बाहेरही आयुष्यभर रक्षण करीत असतो, हे लक्षात ठेवून वागेल, तो भाग्यवान खरा.

..२७..

प्रभुविण कोण कुणाचा वाली ।।धृ।।

कर्ता हर्ता तो करवीता ।
'मी' मिथ्या जनबोली ।।१।।

कोण कुणाचा चाकर मालक ।
व्यर्थचि भाषण खाली ।।२।।

माणिक म्हणे मातेच्या उदरी ।
नवमास रक्षण केली ।।३।।

– श्री माणिक प्रभू

(ट्रॅक नं. ०८५)

भक्ती म्हणजे भगवंताचं आत्यंतिक प्रेम. आत्यंतिक प्रेमाची कसोटी ही की, आपल्याला भक्तीच्या विषयापलीकडं, भगवंतापलीकडं काहीही महत्त्वाचं वाटू नये आणि यासाठी आपण काहीही करायला तयार असावं. वेळी प्राण द्यायचीसुद्धा तयारी असावी. भगवंताचे असे भक्त मात्र फारच विरळ. श्री गोंदवलेकर महाराजांची रामभक्ती अशा उच्चकोटीची होती. या अभंगात ती भक्ती इतक्या आर्ततेनं व्यक्त झालेली आहे की, ऐकणाऱ्याचं हृदयसुद्धा भरून यावं. ते अभंगात म्हणतात की, भक्तीसाठी मी लौकिक सोडला, लोकांची लाजकाज सोडली, अभिमान टाकला, जातपात सोडली, तुझ्या भेटीसाठी मी रानोमाळ वणवण हिंडतो आहे. तू माझा अंत पाहू नको. अखेर ते निर्वाणीचं सांगतात की, तुला भेट द्यायची नसेल तर निदान मग मला मरण तरी दे. श्रींनी वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षापासून घरदार सोडून गुरुभेटीसाठी आणि भगवंताच्या प्राप्तीसाठी वर्षानुवर्षं केलेली वणवणच या अभंगाच्या रूपानं साकार झाल्यासारखी वाटते. या अभंगाच्या श्रवणमननानं, आपण ज्याला भक्ती म्हणतो, ती आपली भक्ती किती वरवरची आणि दिखाऊ असते याबद्दल सावध होऊन, आपण वेळीच खऱ्या भक्तीच्या मार्गावर एक पाऊल जरी पुढं गेलो, तरी ते भाग्यच म्हणावं लागेल.

..२८..

सांडियेली लाज जाति अभिमान ।
फिरे रानोरान तुजसाठी ।।धृ।।

तुजसाठी जीव झाला कासावीस ।
जैसी बाळकास आस लागे ।।१।।

तुझेसाठी माझा प्राण जाऊ पाहे ।
भेटी रघुराये देई मज ।।२।।

दास म्हणे दावी कोमल चरण ।
नाही तरी मरण देई देवा ।।३।।

– श्री गोंदवलेकर महाराज

(ट्रॅक नं. ०८६)

या पदामध्ये संत श्री नरहरी सोनार भगवंताच्या स्मरणाच्या एकमेव श्रेष्ठ साधनासाठी कसे आसुसलेले आहेत, हे दिसून येतं. स्वत:चं शरीर, वाणी, मन सर्वकाही भगवंताला अर्पण करण्यात त्यांची भगवंतावरची अविचल निष्ठा तर दिसतेच पण, त्याही पुढं जाऊन माझं मन केवळ तुझ्या पायी राहील, असं कर – अशी विनवणी ते करतात. इतर कुठल्याही नादाला ते मन लागू नये, अशी कळकळीची प्रार्थनाही त्यांनी भगवंताला केली आहे. भगवंताचा, त्याच्या स्मरणाचा त्यांचा हा आग्रह साधकांना आदर्शवत् आहे.

..२९..

सोडू नये तुझे स्मरण ।
ऐसे करी माझे मन ।।१।।

माझे चित्त तुझे पायी ।
राही ऐसे करी काही ।।२।।

मागणे ते हेचि मागो ।
आणिक न लागो छंदासी ।।३।।

काया वाचा आणि मन ।
समर्पिले तव चरणी ।।४।।

हाचि माझा निर्धार ।
म्हणे नरहरी सोनार ।।५।।

– श्री नरहरी सोनार

(ट्रॅक नं. ०८७)

अक्कलकोटच्या स्वामी समर्थांचे एक थोर शिष्य आणि श्रेष्ठ साक्षात्कारी सत्पुरुष श्री स्वामीसुत महाराज किंवा हरिभाऊ यांचं हे पद जरी त्यांच्या सद्‌गुरूंना उद्देशून त्यांनी लिहिलेलं असलं तरी, त्यातला भाव इतका उत्कट आहे की, ते एक सार्वकालिक प्रार्थनाच झालं आहे. आपापल्या गुरूंना उद्देशून आपण अशी प्रार्थना करावी इतका तन्मय भाव त्या पदात व्यक्त होतो आहे. आदर्श भक्तानं कसं असावं आणि आपल्या गुरूंकडं काय मागावं हेही या पदामुळं साधकांसमोर येऊ शकतं. भक्त होणं म्हणजे भगवंतापलीकडं दुसरं काहीही नको असण्याची पूर्ण तयारी होणं, असं आहे. भक्त कोणत्या त्यागाला तयार असतो याची कल्पना या पदातून फार प्रभावीपणे येते. स्वामीसुतांनी जे मागणं मागितलं– सदैव गुरुमार्गाचं दर्शन आणि दास्यत्व–ते तर सर्व भक्त होऊ पाहाणाऱ्यांना आदर्श म्हणूनच समोर ठेवण्यासारखं आहे.

..३०..

स्वामी देई हेचि दान । नित्य चरणांचे दर्शन ।।धृ।।

मज नको धन दारा । तुझ्या चरणी द्यावा थारा ।।१।।

मज ठेवावे भिकारी । सुखे करीन चाकरी ।।२।।

तुझे नाम माझी जोड । मुखि राहो तेचि गोड ।।३।।

तुझ्या चरणी माझा माथा । ऐसे करी दीनानाथा ।।४।।

तुझे नामी लागो छंद । मज द्यावे 'दास' पद ।।५।।

'सुत' मागे हेचि दान । तुझ्या चरणी होऊ लीन ।।६।।

– श्री स्वामीसुत महाराज

(ट्रॅक नं. ०८८)

संतांच्या पदांच्या अभ्यासातून त्यांच्या भूमिकेचं, त्यांच्या मनाच्या अवस्थेचं जे आकलन होतं, त्यातूनही अनेकदा भगवंतप्राप्तीची कित्येक महत्त्वाची साधनं समोर येतात.अशा अनुभवसिद्ध साधनांच्या अनुसरणानं आपलाही साधनमार्ग प्रशस्त आणि सुकर होतो, असं आढळतं.एकोणिसाव्या शतकातील नगरचे थोर सत्पुरुष श्री जयरामनाना महाराज तसं दीर्घ साक्षात्कारी आयुष्य जगले. पूर्वकल्पना देऊन त्यांनी देह ठेवला. असं असतानाही, आपलं आयुष्य संतांच्या चरणी वाहणारे जयराम नाना महाराज किती नम्र, एकाकार, निर्लोभ, स्वत:ला संतसेवक मानणारे आहेत, हे त्यांच्या निर्वाणीच्या पदात पाहायला मिळतं. माझं जे कर्म चुकलं असेल त्याबद्दल मोठ्या उदार अंत:करणानं मला क्षमा करा, असं म्हणताना स्वत:ला ते हीन, दीन मानतात आणि संतांनी दिलेलं हे शरीराचं वस्त्र मी आता कृतज्ञतेनं परत करतो आहे, असं या पदात ते म्हणतात. हे सारं पाहिलं की, आपल्या उद्धाराची कितीतरी साधनंच जणू आपल्या समोर येतात.

..३१..

तुमचा परोचा दिला तुम्हापाशी ।
चुकल्या कर्माची करा क्षमा ।।१।।

तुमच्या पायांची मज जोड व्हावी ।
आणिक ते जीवी नाही आशा ।।२।।

तुम्ही संतजन कृपेचे सागर ।
दास मी पतित हीन दीन ।।३।।

जयराम विठ्ठल तुमचा सेवक ।
चरणी मस्तक असो माझे ।।४।।

– श्री जयरामनाना महाराज

परोचा – वस्त्र (देह)

(ट्रॅक नं. ०८९)

श्री गोंदवलेकर महाराज यांनी निर्याणाच्या आदल्या दिवशीच्या भजनात जे निर्वाणीचे अभंग म्हटले, त्यांतला हा एक मोठा हृदयस्पर्शी अभंग होय. या अभंगातून लोकांनी नाम घ्यावं, ही त्यांची तळमळ मोठ्या आर्ततेनं व्यक्त झाली आहे. नाम हे साधन अजूनही लहान किंवा कमी प्रतीचं समजणाऱ्यांना त्यांनी आवर्जून सांगितलं आहे की, मी शपथेवर सांगतो की, नाम हे थोर साधन आहे. नाम घेण्यापरतं आपलं खरं हित कशातही नाही. पुढं एक महत्त्वाचं तत्त्व सांगताना महाराज म्हणतात की, एका बाजूला प्रपंच हा आपल्याला त्रासाचा वाटतो आणि दुसऱ्या बाजूला आपण त्यात अडकतो. या दोनही गोष्टी योग्य नव्हेत. एकतर, जसं त्यात अडकू नये, तसं दुसऱ्या बाजूला त्याचा त्रासही वाटून घेऊ नये. आपल्या देहाचा भरवसा नाही हे ओळखून विषयांच्या नादी न लागता वेळीच नामाची कास धरावी. 'निदान आता मी सांगतो म्हणून तरी नाम घ्या', असं ते अखेरीला काकुळतीनं म्हणतात. तेव्हा आपल्याला नाम घेण्याशिवाय पर्याय उरत नाही, असं म्हणावसं वाटतं.

..३२..

आजवरी तुम्हा सांगितली मात ।
नामाविण हित समजू नका ।।१।।

मानू नका नाम साधन लहान ।
तुम्हा माझी आण जीवेभावे ।।२।।

मानू नका सार संसार असार ।
दृश्य हा जोजार मानू नका ।।३।।

सोडू नका नाम धरू नका काम ।
नाही नाही नेम आयुष्याचा ।।४।।

दीनदास म्हणे सांगतो ते ऐका ।
अभ्यास वैखरी सोडू नका ।।५।।

– श्री गोंदवलेकर महाराज

मात – उपाय, जोजार – त्रास

(ट्रॅक नं. ०९०)

श्री समर्थ रामदास स्वामींची ही रचना म्हणजे रामनामासारख्या अल्पाक्षरी पण अलौकिक साधनाचं अत्यंत मोजक्या शब्दांत वैशिष्ट्यं सांगणारी रचना होय. केवळ सतरा शब्दांत त्यांनी नामाचं नेमकं महत्त्व सांगितलं आहे. सतत बदलणाऱ्या जगाला खरं समजणं म्हणजेच भवरोग. या भवाच्या मोठ्या चिवट रोगानं माणसाला कायम अस्वस्थ आणि चिंतातुर ठेवलं आहे. व्यवहाराचा अनुभव असा आहे की, मोठ्या रोगाला मोठं आणि कठीण औषध असतं. पण आश्चर्य हे की, या सार्वत्रिक, त्रासदायक आणि मोठ्या रोगाला औषध सोपं, छोटं, निरुपाधिक रामनाम हे आहे. त्यातही या पदात म्हटल्याप्रमाणं सर्वांत महत्त्वाचं हे की, या औषधाच्या गुणाचा स्वत: श्री समर्थांना प्रत्यय आहे. अनुभव आहे. यातून आपण योग्य तो बोध घ्यावा, असं वाटतं.

..३३..

भवव्यथेसी औषध ।
रामनाम हे प्रसिद्ध ।।१।।

हिंडणे नलगे रानोराने ।
पथ्येविण मुक्त होणे ।।२।।

रामी रामदास म्हणे ।
मज प्रचीत आली येणे ।।३।।

– श्री रामदास स्वामी

(ट्रॅक नं. ०९१)

कृष्णाकाठच्या माहुलीचे थोर सत्पुरुष श्री कृष्णदास महाराज यांचं हे आध्यात्मिकदृष्ट्या अर्थगर्भ पद आकारानं छोटं पण अर्थ आणि अनुभव यानं मोठं. एका प्रचलित समजुतीप्रमाणं दर बारा वर्षांनी कन्यागत पर्वात कृष्णेला भेटायला जशी गंगा येते, तशी साधकाच्या म्हणजे कृष्णदासांच्या साधनकृष्णेलाही बारा बारा वर्षांच्या तपानंतर गुरुकृपेची गंगा प्रसन्न होऊन भेटायला येते. अशा रूपकात ते अभंगात आपला अनुभव मांडतात. साधकाला गुरुकृपेसाठी प्रदीर्घ काळ, शांतपणे साधन करीत राहावं लागतं. उतावीळ होऊन चालत नाही. हीच गोष्ट आध्यात्मिक अनुभवांचीही आहे हे सुचवायला ते म्हणतात की, कुंभमेळ्याच्या पर्वात बारा वर्षांनी जशी गंगा–यमुनेला गुप्तरूपानं सरस्वती येऊन मिळावी तसे हे आध्यात्मिक अनुभवसुद्धा दीर्घ पण योग्य काळानं, साधकाला स्वत:ला येतात – ते तसे दुर्मीळही असतात, सूक्ष्मही असतात आणि गुप्तरूपही असतात. गुरुकृपेचं लक्षण म्हणजे, साधकाच्या ठिकाणी निर्माण होणारी शांत अवस्था हेही कृष्णदासांनी सुचवलं आहे. भक्त भगवंताची भेट घालून देणाऱ्या साधनकृष्णेलाच श्री कृष्णदास महाराज अखेर मोठ्या सूचकतेनं वंदन करतात, यावरून साधकांना प्रत्यक्ष साधना, गुरुकृपा आणि साधनेमुळं मिळणारे अनुभव अशा अनेक महत्त्वाच्या गोष्टींबद्दलचा बोध या पदामध्ये होतो.

..३४..

गुरुकृपा भागीरथी ।
भेटो आली तुज प्रती ।।१।।
तपा तपाने भेटी होई ।
भेटीमुळे शांती येई ।।२।।
स्वानुभव सरस्वती ।
पुढे होय तुज प्राप्ती ।।३।।
तूचि गंगा तूचि कृष्णा ।
दूर करी भव तृष्णा ।।४।।
मज पाहे कृपादृष्टी ।
तुझे पदी घाली मिठी ।।५।।

– श्री कृष्णदास महाराज

(ट्रॅक नं. ०९२)

आपल्या लौकिक आयुष्याच्या अखेरची दहा वर्षं मिरजेत वास्तव्य करून, स्वत:च्या इच्छेनं कृष्णामाईमध्ये देहत्याग करणाऱ्या स्वामी निरंजन रघुनाथांचं हे पद म्हणजे अगदी छोट्याशा स्वत:च्या क्षुल्लक प्रपंचात रमून, भगवंताला विसरून, कृतघ्नपणे जगणाऱ्या जीवांना आर्तपणे घातलेली सादच होय. मनापासून हे पद म्हटलं तर, आपल्याला सावध व्हायला होतं, कुठं चुकतं आहे ते कळतं, जायचा मार्ग कळतो, मार्गदर्शक कोण ते कळतं आणि हे सारं इतक्या जलद करण्याची गरज काय, तेही कळतं. सावध होऊन योग्य मार्गाला लागलो तर, एरवी अप्राप्य वाटणारा भगवंत मिळणंही खात्रीनं कसं शक्य आहे आणि तोही लवकर मिळणं कसं शक्य आहे, हेही स्वामी शेवटी स्वत:च्या अनुभवानं सांगतात. त्यांचा अभंग ऐकल्यावर त्यांची तळमळ आपण वाया जाऊ देऊ नये, एवढंच नम्रपणे म्हणावसं वाटतं.

..३५..

हरिचे गुण गाई । मनुजा

नरतनु गेल्यावरुते मनुजा करसिल मग काई ।।धृ।।

हस्तपादकर्णादिक इंद्रिय सावध जव काही ।

तववरि भगवत्प्रसाद सत्वरि संपादुनि घेई ।।१।।

वाणीचा व्यापार निरंतर सारा हा विषयीं ।

मन चंचल चक्रापरि फिरते विषयांचे ठायी ।।२।।

श्रीहरिप्राप्तीसाठी शरण संतांते जाई ।

निरंजनपद अविनाशी मग पावसि लवलाही ।।३।।

– श्री निरंजन रघुनाथ

(ट्रॅक नं. ०९३)

सर्व संत–सत्पुरुष 'नाम' हे साधन श्रेष्ठ मानतात. त्या नामाची महती ते वारंवार गाताना दिसतात. साधकांना हे गोड नाम घेण्याचा आग्रह या अभंगात श्री समर्थ रामदास स्वामी धरतात पण त्याचबरोबर साधकांच्या दृष्टीनं परमार्थातल्या एका महत्त्वाच्या पैलूवरसुद्धा ते प्रकाश टाकतात. ते म्हणतात, आपण नामासाठी खूप सबबी सांगतो आहोत. कामाचा वेळ एकवेळ राहू दे, पण इतर कितीतरी मोकळा वेळ आपण नुसताच वायफळ गप्पांत दवडीत असतो. याला पुन्हा कारण आपलंच चंचल आणि सतरा ठिकाणी अडकलेलं मन. ते मन आवरून जर आपण सद्‌गुरूंच्या ठिकाणी लावलं, त्यांनी सांगितलेल्या नामाच्या मार्गाला लावलं तर, आपल्यावरचं भवबंधन तोडायला आपल्याला वेळ लागणार नाही. समर्थांचा हा प्रेमळ आदेश साधकांना शिरोधार्यच वाटेल.

..३६..

नाम हरीचे गोड । सखया ।।धृ।।

घेऊनि रुचि त्या नामरसाची ।
भवबेडी हे तोड ।।१।।

बैसुनिया गृही वेळ नको गमू ।
भलती बडबड सोड ।।२।।

रामदास म्हणे आवरुनि मन हे ।
सद्‌गुरुचरणा जोड ।।३।।

– श्री रामदास स्वामी

(ट्रॅक नं. ०९४)

हे अत्यंत भावपूर्ण पद पूज्य तात्यासाहेब केतकरांच्या पत्नी पूज्य यमुनाबाई केतकर यांचं आहे. श्री गोंदवलेकर महाराज हेच उभयतांच्या जीवनाचं सारसर्वस्व झाले होते. उभयतांच्या जीवनात श्री महाराजांच्या शिवाय दुसरा विषय, दुसरा देव उरला नव्हता. पूज्य यमुनाबाईंचं हे पद म्हणजे प्रापंचिकांनी श्रींच्या चरणी रोज करावी, अशी प्रार्थनाच झालं आहे. या पदात ज्या चार गोष्टींची त्यांनी मागणी केली आहे, त्यात एकही प्रापंचिक तर नाहीच पण त्या चार गोष्टी म्हणजे श्रींच्या उपदेशाचं जणू सारच आहे आणि त्या चारही गोष्टी पूज्य यमुनाबाई स्वत: जगल्याही होत्या. त्या चार गोष्टी अशा – रामनाम, अन्नदान, वृत्तीचं समाधान आणि सद्‌गुरूंचा अखंड सहवास. खरोखर, हे ज्याच्यापाशी असेल , त्याचा जगच काय पण जगच्चालक सुद्धा हेवा करील. ही मागणी मनापासून केली तर सद्‌गुरू ती हमखास पुरी करतील, असा दृढविश्वासही त्यांनी पुढं व्यक्त केला आहे. साधकांना हे सारंच मननीय आहे.

..३७..

रामनाम वदो वाणी ।
अन्नदान राहो सदनी ।।१।।

वृत्ति राहो समाधान ।
हेचि मज द्यावे दान ।।२।।

अखंड राहो गुरुवास ।
हाचि माझा निदिध्यास ।।३।।

हेचि मागणे गुरु आई ।
दुजे अन्य काही नाही ।।४।।

हाचि मनी धरी नेम ।
गुरुकृपे होईल काम ।।५।।

दीनदासीची विनवणी ।
कधी भेटेल चक्रपाणी ।।६।।

– कै. यमुनाबाई केतकर

(ट्रॅक नं. ०९५)

माहुलीचे थोर सत्पुरुष श्री कृष्णदास महाराज यांची ही रचना म्हणजे गुरुभक्तीचं एक भावपूर्ण निरूपण आहे. अनेक अभंगांना काळाचा एक संदर्भ असतो. त्यातले दृष्टांत, विषय हे त्या त्या काळातल्या परिस्थितीला धरून असतात. तरीही त्यातला मूळ अनुभव सर्वकाळी खरा ठरत असल्यानं हे अभंग काळापलीकडं जाऊन टिकून राहतात. तसा एक अनुभव या पदामध्ये येईल. त्या काळामध्ये जे लोक थोर, प्रसिद्ध मानले जात ते वेदान्ती, आगमनिगमात प्रवीण, प्रपंच व्यवहारज्ञानात निपुण अशा प्रकारचे असत. आजच्या काळात अशा थोर मानल्या जाणाऱ्यांत विज्ञान, व्यवस्थापन, संगणक अशा अनेक क्षेत्रांतल्या श्रेष्ठांचा समावेश होईल. पण ते जुने, श्रेष्ठ लोक जसे गुरुभक्तीशिवाय या भवसागरात तरू शकले नाहीत, तेच आजच्या श्रेष्ठ आणि प्रसिद्ध लोकांनाही लागू होईल. या साऱ्या अर्थानं शंभर वर्षांपूर्वीच्या या अभंगातला उपदेश आजही आपण सतत मनन करावा असाच आहे.

..३८..

भवसागर उतरेना, प्राणी ।
गुरु भजनावीण तरेना ।।धृ।।
आगम निगम सर्वहि शिकला ।
विद्येमध्ये प्रवीण झाला ।।
परि भवसागर तरेना...प्राणी
सर्व कला त्या अवगत त्याला ।
तीर्थे सर्वहि फिरोनि आला ।। परि..
वेदान्तीही म्हणति तयाला ।
प्रसंग ओळखी झाली त्याला ।। परि..
जावे तिकडे वंदिती ज्याला ।
लोकी धन्य धन्य गाईला ।
व्यर्थ होउनि शहाणा ।।१।।
राम कृष्णादि तत्पर गुरु भजनाला ।
तू भजसीना जरी तयाला ।। व्यर्थ..
अंती कोण रे सोडवि तुजला ।
माय बहिणीचा व्यर्थ गलबला ।। सोडविता..
दादा बापू पाही मढ्याला ।
काळ लावील फांस तुजला ।
सोडविता कोणी दिसेना ।।२।।

– श्री कृष्णदास महाराज

आगमनिगम– वेदवेदान्त

(ट्रॅक नं. ०९६)

गुरूची कृपा आपल्यावर होणं म्हणजे काय आणि त्यांचे उपकार आपल्यावर किती प्रकारे असतात याची कल्पना एक खरा शिष्यच करू जाणे. त्यामुळंच त्याला राहून राहून अतिशय कृतज्ञतेनं त्यांचं हे देणं आपण कसं फेडावं, त्याचं उतराई आपण कसं व्हावं, याची तळमळ लागलेली असते. या पदामध्ये एकोणिसाव्या शतकातले थोर सत्पुरुष, श्रेष्ठ दत्तभक्त श्री निरंजन रघुनाथ स्वामी यांनी आपले सद्गुरू, नाशिकचे श्री रघुनाथ स्वामी यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केलेली आहे. खऱ्या गुरूंचं हे लक्षणच असतं की, शिष्यानं स्वत:चं कल्याण करून घ्यावं. याशिवाय त्याची शिष्याकडून काही अपेक्षाच नसते. अशा खऱ्या निरिच्छ गुरूला कृतज्ञता म्हणून तरी काय द्यावं, हा मोठाच प्रश्न शिष्यांना पडतो. लौकिकातली तर कुठली गोष्ट त्यांना नकोच असते. म्हणून निरंजन स्वामी या पदात म्हणतात देह द्यायला जावं तर, तो ही नाशिवंतच आहे म्हणून शेवटी गुरूंच्या उपकाराचं स्मरण ठेवून त्यांना मनापासून नमस्कार करणं, हाच बरा मार्ग दिसतो आहे. आपल्यालाही साधक म्हणून यातून शिकण्यासारखं आहे.

..३९..

काय होऊ उतराई ।
तया सद्‌गुरुच्या पायी ।।१।।

ज्याच्या वचने संसार ।
उठाउठी जाला दूर ।।२।।

देऊ धनसंपत्तीसी ।
तरि ते मिथ्या जड राशी ।।३।।

देह करावा अर्पण ।
तरी तो नाशवंत जाण ।।४।।

निरंजन म्हणे फार ।
करू आता नमस्कार ।।५।।

– श्री निरंजन रघुनाथ

(ट्रॅक नं. ०९७)

श्री मारुतिरायांच्या दास्यभक्तीचा अलीकडच्या काळात प्रत्यय आणून देणारे थोर सत्पुरुष समर्थ रामदास स्वामींचा हा अभंग एका बाजूनं अत्यंत नम्रतेनं भक्तीतल्या, भक्तिसाधनातल्या अज्ञानाची प्रांजळ कबुली देणारा, पण दुसऱ्या बाजूनं खऱ्या भक्तीचं, भक्तिसाधनांचं, भक्तिभूमिकांचं, अनुभवांचं निःसंशय ज्ञान व्यक्त करणारा अभंग आहे. ते म्हणतात, खरी भक्ती कुठली, खरा भाव कुठला हे मी खरोखर जाणत नाही. पण याच पुढं ते म्हणतात की, खरोखरच मला रामाशिवाय दुसरा देवही कळत नाही. आता खरं पाहता, आपल्या उपास्य, प्रिय दैवताशिवाय दुसरं दैवत न जाणणं हे एका अर्थानं अज्ञान तर दुसऱ्या चांगल्या आणि खऱ्या अर्थानं खरं ज्ञान आहे. ते खऱ्या शरणागतीचं लक्षण आहे. आपले सद्‌गुरू, आपलं दैवत, त्याचं नाम, त्याची आज्ञा – हे सारं खऱ्या भक्ताला पुरेसं साधन असतं. श्री समर्थ पुढं म्हणतात तसं, हे अनन्यतेचं साधन करणाऱ्याला एरवी मोठे वाटणारे इच्छेसारखे, कामासारखे आणि काळासारखे शत्रूसुद्धा बाधू तर शकत नाहीतच, पण रामनामानं, अनन्य शरणागतीनं भक्तीचीच सत्ता अशा काळकामावर चालते– यात भक्तीचंही श्रेष्ठत्व कळतं आणि खऱ्या भक्तीची गरज आणि सामर्थ्यही.

..४०..

नेणो भक्ती नेणो भाव ।
आम्ही नेणो दुजा देव ।।१।।

राघोबाचे शरणागत ।
जालो रामनामांकित ।।२।।

मुखी रामनामावळी ।
काळ घालू पायातळी ।।३।।

रामदासी रामनाम ।
बाधू नेणे काळ काम ।।४।।

– श्री रामदास स्वामी

(इथून पुढील पदे रेकॉर्ड झाली नसल्यामुळे त्यांचे ट्रॅक नंबर दिलेले नाहीत.)

श्री गोंदवलेकर महाराजांचा हा अभंग म्हणजे आर्त शरणागतीचा हृदयस्पर्शी आलेखच आहे. कधी कर्तृत्वानं हरायला होतं, कधी परिस्थिती अनाकलनीय बनते, कधी मानवी मर्यादांचं तीव्र आकलन होतं, कधी विराट वैश्विक शक्तीचं कुणा दैवताच्या–संतांच्या रूपानं दर्शन होतं –असं काही ना काही आकलन होऊन अनेक जण शरणागत होतात. त्या उपास्य दैवताला एकदा शरण गेल्यावर आता त्यानं आपल्याला तारावं, जवळ घ्यावं, आपली प्रगती घडवावी – अशा रास्त अपेक्षाही शरणागतांना वाटतात. लौकिक अपेक्षा सोडल्या तरी, निदान पारमार्थिक दृष्ट्या तरी, या प्रगतीच्या, चित्ती राम वसण्याच्या अपेक्षा बाळगणं स्वाभाविकच आहे. अशा वेळी त्याही पुऱ्या झाल्या नाही तर मात्र, जी व्याकुळता येते ती या अभंगात यथार्थपणे आली आहे. अनेक साधकांनाही हा अनुभव असेल. यातली व्याकुळता इतकी परिणामकारक आहे की, ती आपणही मनःपूर्वक आळवली तर आपण भक्त म्हणून कमी पडत असू तरीही भगवंताला आपल्यावर कृपा करावीशी वाटेल.

..४१..

शरणागत असता का हो उपेक्षिता ।
तुम्हावीण त्राता दुजा नाही ।।धृ।।

जगी मीच एक पापी जन्मा आलो ।
माझी का हो करुणा तुम्हा न ये ।।१।।

रामा तुझे पायी अनन्य शरण ।
धरिले ते चरण न सोडी आता ।।२।।

दास म्हणे आता पडिलो विपत्ती ।
सदा माझे चित्ती राम वसो ।।३।।

– श्री गोंदवलेकर महाराज

बेसावधपणे जगणाऱ्या सामान्य माणसाला सावध करणारं, हे संत कबीरजींचं पद अनेक अर्थांनी महत्त्वाचं आहे. आधी माणसाला भक्तीची गोडी लागत नाही, त्यात पूर्वपुण्याईनं कुठं ती वाटलीच तर, भक्तीतल्या कुठल्या तरी अवडंबरात तो अडकतो तरी किंवा त्यांच्या भीतीनं तो भक्तीपासून लांब तरी राहतो. अशा माणसाला मोठ्या आत्मीयतेनं ते भगवंताची भक्ती करण्याचं आवाहन करतात आणि तळमळीनं सुरुवातीलाच सांगतात की, भक्तीला कुठल्या मोठमोठ्या साधनांचीही गरज लागत नाही आणि स्वतःच्या पदरची कुठली वस्तू–पैसा–धनदौलतही खर्चावी लागत नाही. त्याचबरोबर आपल्याला या इतक्या मोलाच्या भगवंताचा, त्याच्या भक्तीचा विसर पाडणारी नाना सुखं, गणगोत आणि मालमत्ता – या तीन घटकांचाही विचार करावा आणि हेही लक्षात घ्यावं की, आपल्या डोक्यावर सतत टांगलेल्या मृत्यूची आठवण ठेवून तळमळीनं देवाचं नाव घ्यावं आणि आपल्या आयुष्याचं सार्थक करावं. शेवटी कबीर म्हणतात, आपल्या असीम उपकारकर्त्या देवाचं नाम ज्या मुखात येत नाही त्या मुखाला धुळीचीसुद्धा किंमत नाही. हे सारं लक्षात ठेवून साधकाला जाणीवपूर्वक, तळमळीनं भक्तीची वाटचाल करता येईल.

..४२..

भजो रे भैया राम गोविंद हरि ।।धृ।।

जपतपसाधन कछु नहीं लागत ।
खरचत नहीं गठरी ।।१।।

संतति संपति सुख के कारन ।
ज्यासे भूल परी ।।२।।

रामनाम का सुमिरन कर ले ।
सिर पे मौत खडी ।।३।।

कहत कबीर ज्या मुख राम नाहीं ।
वो मुख धूल परी ।।४।।

– श्री कबीर

आपले सद्‌गुरू श्री पंत महाराज यांच्यावर आत्यंतिक श्रद्धा असणाऱ्या आणि कीर्तन हे साधन आजन्म करणाऱ्या, भडगावच्या थोर संत श्री अवधूत महाराज तथा मोरया महाराज यांचं हे पद आत्मानुभव, संतनिष्ठा, संतकार्य आणि शरणागती यांचा सुरेल संगम आहे. संतांच्या संगतीनं माणसाला खऱ्या, निर्भेळ शांतीची ओळख होते, निर्वासनतेची – तिच्यामुळं मिळणाऱ्या आनंदाची कल्पना येते, इतकंच नव्हे तर श्री अवधूत महाराज म्हणतात, मला तिचा साक्षात अनुभव आला आहे. माणसाला अनेक प्रकारचं ज्ञान आयुष्यात होतं. तो, ते ज्ञान करून घेण्यासाठी धडपडतोही, मिळवल्यावर त्याचा त्याला मोठा अभिमानही होतो. पण जे ज्ञान माणसाला मुक्त करतं, निरभिमान करतं, अशा आत्मज्ञानाचा उगम आपल्या ठिकाणी कुठं होतो, त्याचा प्रत्यय याच देही कसा घ्यावा – अशा अनेक गोष्टी संतकृपेनं आपल्याला अवगत होतात, म्हणून कल्याण इच्छिणाऱ्यांनी संतांना शरण जावं, त्यांचं गुणगान करावं आणि त्यांनी आपल्याला सांभाळावं अशी प्रार्थना करावी. जे सार श्री अवधूत महाराजांनी आचरलं आणि अनुभवलं आहे. म्हणून या अभंगाला संतवचनांचं परिमाण आहे.

..४३..

कळो आली शांती वासना निमाली ।
उन्मनी भोगिली याच देही ।।धृ।।

याच देही आहे त्रिवेणी संगम ।
ज्ञानाचा उगम संत जाणे ।।१।।

संतांसी नमन भक्तिभावे करा ।
रज तम सारा घालवी जो ।।२।।

घालवील पाप अनंत योनींचे ।
गुण गाऊ त्याचे आवडीने ।।३।।

आवडीने माता रक्षी बाळकासी ।
तैसे मोरयासी सांभाळावे ।।४।।

– श्री अवधूत महाराज

माणसाला नकळत मोह घालणाऱ्या ज्या अनेक गोष्टी आहेत, त्यांत काही सिद्धी म्हणजे त्यांच्या रूपानं काही आध्यात्मिक, यौगिक सत्ता वश व्हाव्या असं वाटणं, त्यांच्या वापरानं लोकांना प्रभावित करणं, त्यामुळं लोकांकडून प्रसिद्धी – मान मिळणं, पैसा–वस्तू यांसारखे लौकिक लाभ होणं – हे या मोहाचं स्वरूप आणि परिणाम आहेत. हा सिद्धींचा प्रांत आध्यात्मिक वाटला किंवा काही वेळा साधनेच्या तीव्रतेचा परिणाम म्हणून तो नकळत येतही असला तरी, परमेश्वरप्राप्तीच्या, शुद्ध आनंदाच्या ध्येयाच्या दृष्टीनं, त्यात काहीच आध्यात्मिक किंवा उच्च स्वरूपाचं नाही. उलट पैसा–मान–प्रसिद्धी अशा कुठल्याही प्रकारे ही सिद्धींची सत्ता माणसाच्या खऱ्या प्रगतीत अडथळा बनते, नव्हे त्याला आडमार्गाला नेते. याची जाणीव देणारा, त्याविषयीची ही भूमिका स्पष्टपणे मांडणारा हा स्वामी स्वरूपानंदांचा अभंग साधकाला सावध तर करतोच, पण असले अडथळे आणि आकर्षणं टाळून मूळ देवप्राप्तीची वाटचाल करायला प्रवृत्तही करतो. ज्या सिद्धी किंवा त्यातून येणारी सत्ता – प्रसिद्धी यांचं कुणाही सामान्य माणसाला आकर्षण वाटेल – त्या गोष्टींना स्वामी प्राकृत किंवा बाळबोध म्हणतात. यावरून आपण बोध घेण्यासारखा आहे. तसंच भगवंताच्या पायाशी आणि प्राप्तीत आपलं खरं समाधान आहे, ही त्यांना वाटणारी निखालस खात्रीही बोध घेण्यासारखीच आहे.

..४४..

जेणे अंतरती हरी तुझे पाय ।
करावे ते काय चमत्कार ।।धृ।।

कशासाठी व्हावी वश ऋद्धिसिद्धी ।
नावाची प्रसिद्धी कशासाठी? ।।१।।

मज तृणवत् गमे हे प्राकृत ।
आहे आत्महित तुझे पायी ।।२।।

स्वामी म्हणे माझे एक तू निधान ।
नाही समाधान तुजविण ।।३।।

– स्वामी स्वरूपानंद

प्राकृत – सामान्य, तृणवत् – कस्पटासमान, निधान – ठेवा

समर्थशिष्या श्री वेण्णास्वामींचं हे पद, हे एक उपास्य दैवत म्हणून श्रीरामरायाचं नुसतं गुणगान करणारं पद नाही तर, खऱ्या रामस्वरूपाचं, त्यांच्या कार्याचं आणि स्वानुभवानं, भक्तीनं गाठायच्या ध्येयाचा बोध करून देणारं भक्तिरसायन आहे. वेण्णाबाई प्रथम, रामाच्या आपल्या आयुष्यातल्या खऱ्या कार्याचं, कृतज्ञतेनं धृपदात स्मरण करतात – ते कार्य आहे, माणसाला त्याच्यावरच्या विविध बंधांतून मुक्त करण्याचं. विकार–वासना–प्रारब्ध–चुकीच्या कल्पना–विचार इथंपासून देहापर्यंत असलेल्या सर्व बंधांपर्यंत आपल्या भक्ताची सोडवणूक – म्हणजे विमोचन – करणारा हा राम, बाह्यतः कौसल्येच्या पोटी जन्माला आलेला सगुण राम तर आहेच पण, प्रत्येक मनुष्यमात्राच्या अंतर्यामी चैतन्यरूपानं सदैव वास करणारा, दिशा देणारा, सोबत देणारा, बंधविमोचक आत्मारामही आहे. या त्यांच्या दोनही स्वरूपांना जाणण्यासाठी सद्‌गुरूंची मदत घ्यावी, अखेर आत्मारामाला शरण जावं आणि पूर्णत्वाचा प्रत्ययही याचि देही घ्यावा, असा अनुभव पदकर्त्या श्री वेण्णास्वामींनी भगवंतचरणी सार्थपणे खरोखर पूर्णपणे विराम पावण्याचा परमश्रेष्ठ अनुभव घेतला आणि या पदाच्या निमित्तानं तो आपल्याला लाभतो आहे. भक्तांना प्रेरक आहे.

..४५..

बंध विमोचन राम ।
माझा बंध विमोचन राम ।।धृ।।

सकलहि ऋषिमुनि भजति तयासी ।
तेचि एक सुखधाम ।।१।।

सद्‌गुरुकृपया ओळखिला जो ।
कौसल्येचा राम ।।२।।

भावभक्तिच्या सुलभसाधनी ।
पुरवी सकळहि काम ।।३।।

शरण ही वेणा आत्मारामा ।
पावली पूर्णविराम ।।४।।

– श्री वेण्णास्वामी

मनाचं माणसाच्या व्यवहारातलं स्थान कल्पनातीत महत्त्वाचं आहे. माणसाच्या शरीरानं सारे लौकिक व्यवहार अगदी ढोबळ स्वरूपाचे आणि स्थूल दिसले, विविध इंद्रियांच्या मार्फत ते चालताना दिसले तरी, त्यांना वळण देणारं अखेर मन असतं, हे शोधणाऱ्याच्या लक्षात येऊ शकतं. ते इंद्रियांच्या साहाय्यानं सुख मिळवण्याच्या धडपडीत साधारणतः दिसतं. त्यावेळी ते मन मर्यादित आणि त्या अर्थानं अशुद्ध असतं. त्यामुळं सुख मिळतंही पण त्याची दुसरी बाजू म्हणून दुःखही मग स्वीकारावं लागतं. अशा अशुद्ध मनाचीच बहुतेकांना आयुष्यभर साथसोबत होते. पण कधी सत्संग घडला, अधिक जिज्ञासा, साधन घडलं तर, मन शुद्ध होऊन इंद्रियातीत खऱ्या आनंदाचा, शाश्वत सुखाचा– देवराजा ओळखायला येतो. मग हे सुखदुःखाचं जिणं जिंकलं जातं आणि खऱ्या–शुद्ध–नित्य आनंदाची ओढ लागते. अखेर याच 'सत्ताधारी मना'च्या, आता 'शुद्ध मना'च्या साहाय्यानं या आनंदरूप देवाचं दर्शन घडतं – अशा या शुद्ध मनाच्या सामर्थ्याचं, उपयुक्ततेचं नेमकं वर्णन श्री विश्वनाथ महाराजांच्या या अभंगात घडतं.

..४६..

ज्याचे मन शुद्ध झाले ।
त्याने सुखासी जिंकिले ।।धृ।।

सत्ताधारी ऐसे मन ।
पडिले इंद्रिया वळण ।।१।।

करावया भावे पूजा ।
मन ओळखे देवराजा ।।२।।

विश्वनाथा थोर मन ।
घडवी देवाचे दर्शन ।।३।।

– श्री विश्वनाथ महाराज

श्री ज्ञानेश्वर माउली म्हणजे साक्षात सगुण परमात्माच. पण या देहाचं बंधन त्यांनी धारण केलं. त्यामुळं संकुचित–स्वार्थी जगरहाटीशी त्यांचा संपर्क आला. साहजिकच अशा परिस्थितीत जे मानवी जगाचे देवत्वावर अविरत आघात होतात, ते सहन करताना, एखादा आघात धारण केलेल्या देहातलं मानवपण क्वचित झाकळून टाकतोच. त्या क्षणालाही पुसून टाकणाऱ्या त्यांच्या थोर संत भगिनी मुक्ताबाईंच्या अभंगातला हा एक उद्‌बोधक अभंग. त्या म्हणतात, ज्ञानसागरा, हे जग तर असंच अशांत, प्रक्षुब्ध असणार. त्याच्या संगानं आपण क्षुब्ध होऊन कसं चालेल ? उलट आपणच शांतीचा, सुखाचा असीम सागर व्हावं आणि आपल्या अस्तित्वानं, अंतःकरणाला साद घालणाऱ्या बोलानं, बोधानं प्रक्षुब्ध जगाला शांत करावं. आपल्याला सारेच आपले. त्यांच्या स्थितीवर–वर्तनावर भेद न करता सर्वांनाच आपण बोध करावा. एकदा आपलं मानलं की, कुणापासून काही इच्छा धरू नये. मग साऱ्या निराशेतून बाहेर पडण्याचा तरणोपाय आपल्याला गवसेल. आपल्या लक्षात येऊ शकतं की, कुणाही सामान्य साधकालासुद्धा साधनेत, आनंदाच्या प्राप्तीत आड येणारे जगरहाटीचे अडथळे दूर करून आनंदाचा मार्ग मोकळा करायला हा अभंगातला आर्त उपदेश खचितच उपयोगी ठरेल.

..४७..

सुखसागर आपण व्हावे ।
जग बोधे नीववावे ।।१।।

बोधा करू नये अंतर ।
साधु नाही आपपर ।।२।।

जीव जिवासी पै द्यावा ।
मग करू नये हेवा ।।३।।

तरणोपाय चित्ती धरा ।
ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।४।।

– श्री मुक्ताबाई

हेवा – अपेक्षा (जुना अर्थ)

माणूस पोटासाठी काम करतो, त्यानं ते अवश्य करावंही. आळशीही राहू नये. पोटाच्या बाबतीत परावलंबी तर अजिबात राहू नये – हे खरं आहे. ज्याला चांगल्या अर्थानं स्वाभिमान आहे, संस्कार आहे, कष्टांची क्षमता आहे – तो हे सारं न सांगताच करीत असतो. फक्त दोन अडचणी त्यातून निर्माण होतात – एक म्हणजे, माणूस पोटासाठी राबता राबता, पोटापुरतं राबायचं हे विसरतो. ज्यामुळं राबण्याची सवय आणि पुढं आवड लागून तो मरेपर्यंत राबत सुटतो, अर्थातच अखेर पोट देण्यामागचा निसर्गाचा काय, देवाचा काय हेतू शोधण्याचं काम राहून जातं – ज्यामुळं आयुष्य म्हणजे नुसती राबणूक होऊन बसते. त्या अर्थानं आयुष्य निरर्थक ठरतं. दुसरं असं की, पोटापुरतं म्हणजे गरजेपुरतं, हे भान राहात नाही, गरज आणि चैन यांतला फरक कळत नाहीसा होतो आणि त्याही वाटेनं पुढं आयुष्य वाया जातं. वास्तविक, श्री तुकोबा या अभंगात सांगतात त्याप्रमाणं, गरजेपुरतं राबल्यावर उरलेलं आयुष्य 'रामा'साठी म्हणजे दुसऱ्यांसाठी – समाजासाठी – भगवंतासाठी देण्याची गरज आहे. त्यातही पुन्हा ज्यांची आधीच पोटाची सोय झाली आहे म्हणजे जे समृद्धीचं प्रारब्ध घेऊन आले आहेत, अशांनी तरी, आपलं सारं आयुष्य सेवेला आणि भक्तिमार्गाला देण्याची गरज आहे. या साऱ्या तत्त्वांच्या प्रकाशात आपापली आयुष्य तपासली, घडवली तर किती बरं होईल !

..४८..

पोटापुरते काम । परी अगत्य तो राम ।।धृ।।

कारण ते हेचि करी । चित्ती पांडुरंग धरी ।।१।।

प्रारब्धी हेवा । जोडी देवाची ते सेवा ।।२।।

तुका म्हणे बळ । बुद्धी वेचुनी सकळ ।।३।।

– श्री तुकोबा

कारण – (इथं) हेतू, ध्येय , प्रारब्धी – जन्मतः अनुकूल असलेले

परमार्थातलं सर्वांत मोठं, मोलाचं साधन असं ज्याचं वर्णन केलं जातं, त्या 'सावधानते'चा संदेश देणारा, हा श्री विश्वनाथ महाराजांचा मोलाचा अभंग. व्यवहारातही या सावधानतेची किती गरज असते, ती सावधता जो नेहमी दाखवू शकतो – तो किती यशस्वी होतो, हे आपण पाहतोच. पण परमार्थात या सावधानतेचं मोल मोठं आगळं आहे. कारण परमार्थ हा मनाचा आणि त्याच्याच साहाय्यानं त्याच्या पलीकडं जाण्याचा आहे. त्यामुळं मन आपल्याला बेसावध ठेवून त्याच्या पलीकडं जाऊ न देण्याचा धोका सर्वांत जास्त आहे. म्हणून श्री विश्वनाथ महाराजांनी म्हटल्याप्रमाणं सातत्यानं खरी सत्कर्मं करणं, त्याची मनाला गोडी उत्पन्न करणं, चटकन अहंकारानं आपलं नुकसान करू पाहणारं मन आवरून मनाला कटाक्षानं, विचारानं नम्रतेचं वळण देत राहाणं, संतांच्या म्हणण्याचा आधार घेऊन सत्य– असत्य, सार–असार – यांचा विचार करणं या ज्ञानाच्या मार्गानं खरी भक्ती करीत राहाणं, याची प्रगतीसाठी साधकाला आत्यंतिक गरज आहे. ही सावधानता सातत्यानं राहावी म्हणून प्रेमपूर्वक नामस्मरण केलं तर, सद्गुरुकृपेनं ही सावधानता टिकून साधकाचा प्रवास सफळ, संपूर्ण होईल.

..४९..

साधकाने नित्य सावध असावे ।
मना बोधवावे भक्तिज्ञान ।।धृ।।

सत्कर्माची गोडी मनासी लावावी ।
विचारे करावी वृत्ती लीन ।।१।।

पदोपदी सत्य विचार करावा ।
आधार हा घ्यावा संतांचा तो ।।२।।

म्हणे विश्वनाथ प्रेमाने अंतरी ।
जपता श्रीहरी गुरुकृपा ।।३।।

– श्री विश्वनाथ महाराज

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्तांतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. **पावनपथ :** श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. **अनुभवपुष्पे - भाग १ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. **कृतज्ञतामार्ग :** कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. **ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात :** आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. **श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)** श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. **संतबोध : भाग ४ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. **श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार :** मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. **उत्तरायण -भाग ३ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. **अनुभवपुष्पे - भाग २ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. **श्रद्धा :** श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. **अनुभवपुष्पे - भाग ३ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. **अर्घ्य :** ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. **जीवनचिंतन :** दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. **स्वास्थ्यसंवाद :** मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. **वचनांजली भाग १ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. **अक्षरायण :** आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. **वचनांजली भाग २ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. **भावगीता :** श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

भजन बिना सुख नाहीं...